कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५
किंमत ४ ₹

आजचा रंग पिवळा



## लेहमध्ये आंदोलनाला हिंसक वळण

**लडाख :** सोनम वांगचुक लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा आणि संविधानाच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी उपोषणावर आहेत. या आंदोलनाने हिंसक वळण घेतले. बुधवारी केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने विद्यार्थी रस्त्यावर उतरले. निदर्शकांची पोलिसांशी झटापट झाली, दगडफेक झाली आणि सीआरपीएफच्या एका वाहनालाही आग लावण्यात आली. निदर्शक भाजप कार्यालयाबाहेरही निदर्शने करत आहेत. लडाखची सर्वोच्च संस्था लडाखला राज्याचा दर्जा देण्याची मागणी करत आहे.







# प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात एक दवाखाना

## • कामगारांच्या आरोग्यासाठी ठोस प्रस्ताव

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील तळोजा आणि इतर औद्योगिक क्षेत्रांतील कामगारांसाठी आरोग्य सेवा हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला प्रश्न आहे. कर्मचारी राज्य विमा महामंडळाकडून (ईएसआयसी) रुग्णालय उभारण्याचा निर्णय वारंवार लांबणीवर टाकला जात असल्याने कामगारांना उपचारासाठी लांब प्रवास करावा लागतो. या पार्श्वभूमीवर नुकत्याच १७ सप्टेंबर रोजी पनवेल इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट येथे झालेल्या विशेष बैठकीत उद्योजक संघटनांनी कामगारांच्या आरोग्य सुरक्षेसाठी प्रत्येक औद्योगिक वसाहतीत किमान एक दवाखाना सुरू करण्याचा ठोस प्रस्ताव मांडला आहे.

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली २३ ऑगस्टला झालेल्या उद्योग सुसंवाद बैठकीत उद्योजकांनी ईएसआयसी मंडळाच्या काम काजाविषयी गंभीर तक्रारी नोंदवल्या होत्या. या तक्रारींवर जिल्हाधिकाऱ्यांनी इएसआयसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना थेट चर्चे साठी बोलावून घेतले. त्यानुसार ईएसआयसीचे सहसंचालक सुधाकर सिंह यांच्या उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कामगारांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ईएसआयसीकडून ठोस निर्णय अपेक्षित असल्याची मागणी सर्व उद्योजक संघटनांनी एकमुखाने केली.

पनवेल व तळोजा औद्योगिक क्षेत्रांमध्ये सुमारे ५० हजारांहून अधिक कायम व कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. परंतु, आजवर एकही स्वतंत्र ईएसआयसी रुग्णालय उपलब्ध नाही. तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये कामगारांसाठी एकही प्राथमिक आरोग्य केंद्र उपलब्ध नाही. सर्दी, खोकला, ताप यांसारख्या साध्या आजारांसाठी आणि अपघातातील गंभीर उपचारांपर्यंत कामगारांना पनवेल किंवा कळंबोलीला धाव घ्यावी लागते. फक्त प्रवासासाठीच ३०० ते ४०० रुपये रिक्षा भाडे मोजावे लागते. एमआरआय, सोनोग्राफी, हृदयरोग उपचार यंत्रणा तळोजासारख्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रात खासगी रुग्णालय सुद्धा नसल्याने कामगारांची प्रचंड हेळसांड होत आहे. वेळेत उपचार न मिळाल्याने अनेक कामगारांचा मृत्यू झाल्याच्या अनेक घटनासमोर आल्या आहेत.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ईएसआयसी रुग्णालयासाठी २ एकर भूखंड देण्याची तयारी दाखवली होती; मात्र, ईएसआयसीने निकषाप्रमाणे १०० खाटांचे रुग्णलायासाठी ५ एकर जागेची मागणीवर ठाम असल्याने रुग्णालयाचा विषय अडखळला. परिणामी ना रुग्णालय, ना दवाखाना अशी अवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे रुग्णालयाच्या कामाला वेळ लागणार असल्याने तत्पूर्वी पनवेलमधील प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात दवाखाने सुरू करून कामगारांना दिलासा द्यावा, अशी ठाम मागणी बैठकीत करण्यात आली.

### उद्योजकांच्या समस्या मांडल्या

**पनवेलमधील उद्योजकांना उत्पादन घेताना येणारे विविध प्रश्न व अडचणी सोडविण्यासाठी लघु उद्योग भारतीचे प्रदेशमंत्री गौरव जोशी, मिलिंद गांगल, पनवेल को.ऑप. इंडस्ट्रियल इस्टेटचे विजय लोखंडे, जवाहर इंडस्ट्रियल इस्टेटचे स्वप्नील गुप्ते, तळोजा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे (टीएमए) शेखर श्रृंगारे यांनी उद्योजकांच्या समस्या या बैठकीत मांडल्या.**

जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत ईएसआयसी मंडळाला तातडीने पुढाकार घेण्याचे आदेश दिले. तसेच, तळोजा औद्योगिक क्षेत्रात रुग्णालय व दवाखाना उभारणीसाठी योग्य भूखंड उपलब्ध करून देण्याचे निर्देश एमआयडीसीला देण्यात आले. यासोबतच पुढील महिन्यात सविस्तर आढावा बैठकीचे आयोजन करण्याचेही ठरविण्यात आले आहे.

टीएमएचे अध्यक्ष शेखर श्रृंगारे यांनी तळोजात रुग्णालयाची व्यवस्था करण्याची मागणी केल्यावर जिल्हाधिकारी जावळे यांनी तळोजा विस्तारीत एमआयडीसीमध्ये ५ एकरचा भूखंड रुग्णालयासाठी आरक्षित ठेवण्याची सूचना केली. तसेच, खालापूर तालुक्यातील पाताळगंगा येथे एचओसी कंपनीचे रुग्णालयाची जुनी इमारत वापरण्यायोग्य आहे का, याची चाचपणी करण्याची मागणी उद्योजकांनी केली. या दोन्ही बाबींवर जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

# हाय सिक्युरीटी नंबरप्लेटसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

| रायगड | प्रतिनिधी |

वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट बसविणे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी वाहनांची ओळख पटवणे, नंबरप्लेट मध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी व नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना हाय सिक्युरीटी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या वाहनधारकांची वाहने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादीत झालेली आहेत अशा सर्व वाहनधारकांनी परिवहन विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन त्याबाबत नोंदणी करावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी केले आहे.

या कामासाठी परिवहन विभागाने अधिकृत कंपन्याची नेमणूक केली असून त्यांच्यामार्फतच हाय सिक्युरीटी नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. इतर अनधिकृत विक्रेत्यांकडुन नंबरप्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये नोंद होणार नाही. परिवहन विभागामार्फत सदर हाय सिक्युरीटी नंबरप्लेट बसविण्याकरिता देण्यात आलेली मुदत नागरिकांच्या सोयीसाठी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई महाराष्ट्र राज्य यांच्या दि.१४ ऑगस्टनुसार दि. ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे, याची सर्व वाहनधारकांनी नोंद घ्यावी.

# अर्ज स्वीकारण्यास २९ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

| रायगड | प्रतिनिधी |

सन २०२५-२६ या वर्षापासून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेकरीता पात्र विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org, या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरुन आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव श्रीबाग येथील सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण येथे सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याणचे सुनिल जाधव यांनी केले आहे.

राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फ ुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाची मुदत ०१ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर देण्यात आली होती. वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज करावयाच्या कालावधीमध्ये वाढ करण्याची विद्यार्थ्यांची मागणी झाल्याने या प्रवेश प्रक्रियेसाठी खालील विवरणपत्राप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली आहे.

१२ वी नंतरच्या दिनांक व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून), प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी १९ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर, छाननी करावयाचा कालावधी.०१ नोव्हेंबर ते ०९ नोव्हेंबर पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार प्रवेशाची अंतिम मुदत १० नोव्हेंबर लज्ञ; अर्ज सादर करण्याकरीताचे वेळापत्रक देण्यात आले आहे.

# पेण येथे वनहक्क जागरचा समारोप

**पेण** : अंकुर ट्रस्ट आणि आदिवासी समाज वन हक्क जागर यांच्या संयुक्त विद्यमानाने गुरुवारी (दि.२५) हुतात्मा नाग्या महादू कातकरी हुतात्मा दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पेण येथील चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनी हा कार्यक्रम होणार असून, यानिमित्ताने सुरू असलेल्या 'वन हक्क जागर' अभियानाचा समारोप देखील करण्यात येणार आहे. या संदर्भात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी माहिती दिली आहे.

# सकल मराठा समन्वयकांकडून कर्जत तहसीलदारांना निवेदन

## • कुणबी नोंदी फेर तपासणीसाठी लेखी अर्ज करणार

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील कुणबी नोंदीबद्दल सकल मराठा समाजाच्यावतीने कर्जत तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी कुणबी नोंदी संदर्भातील पुरावा देण्यासाठी शासनस्तरावर कोणतेही अडथळे आणले जाणार नाहीत, असे आश्वासन तहसीलदार यांनी दिले.



प्रत्येक जिल्हा आणि तालुक्यांमध्ये अनेक ठिकाणी मराठा कुणबी नोंदी आढळून आल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील विशेषतः कर्जत तहसील कार्यालयात त्या दरम्यान अद्याप एकही नोंद सापडली नव्हती. हे लक्षात आल्यानंतर याबाबत कर्जत तालुका मराठा समाज समन्वयक यांनी या शासकीय कुणबी नोंदी तपासणी बाबत शंका निर्माण झाली होती. त्यामुळे तालुक्यातील सकल मराठा समाज समन्वयक यांनी कर्जतचे नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी निवेदन सादर केले. यावेळी शंकर थोरवे, उदय पाटील, अनिल भोसले, सुरेश बोराडे, ज्ञानेश्वर भालिवडे, प्रदिप ठाकरे, बजरंग श्रीखंडे, मनोज लाड, आरुण देशमुख, भानुदास पालकर, रत्नाकर बडेकर, विलास श्रीखंडे, सुनिल श्रीखंडे, रामचंद्र राऊत, ॲड मोरे, महेश श्रीखंडे, हरेश तुपे, योगेश आगज, ज्ञानेश्वर तुपे, स्वप्निल हगवणे आदी उपस्थित होते.

दरम्यान, पोटल येथील मराठा समाज बांधवांनी रायगड जिल्हा परिषद शाळेतील नोंद वहीत गावातील अनेकांच्या कुणबी नोंदी असल्याचे पुरावे समोर आणून दाखवल्या आहेत. त्यामुळे कर्जत तहसील कार्यालयात कुणबी नोंद का सापडल्या नाहीत, असा सवाल कर्जत तालुका मराठा समन्वयक उदय पाटील यांनी निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत यांना केला. याबाबत निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत यांनी सकारात्मक भूमिका घेऊन ज्यांना आपल्या कुणबी नोंदी असल्याबाबतची तपासणी करण्याची मागणी केली.

### माजी चेअरमनविरोधात अपहाराचा गुन्हा

**पोलादपूर** : तालुक्यात नव्याने काही पतसंस्था उदयास येत असताना अनेक नॉनबॅंकिंग संस्था, पतसंस्था व पतपेढ्या स्थापन होऊन आर्थिक गैरव्यवहाराच्या गर्ते त बुडत आहेत. यामध्ये आता पोलादपूर तालुका सरकारी कर्मचारी सहकारी पतसंस्थेची भर पडली असून निवडणुकीने निर्माण झालेल्या संचालक मंडळाऐवजी लेखापरिक्षकांकडून व्यक्तीविरोधी तक्रार पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. त्यामुळे फक्त माजी चेअरमनविरोधात आर्थिक अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलादपूरचे सहाय्यक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी दिली आहे. याप्रकरणी त्यांना ७ वर्षांपेक्षा अधिक काळ शिक्षा होऊ शकते.

# मत्स्यशेतीतून हक्काचा रोजगार

## महाड तालुक्यातील आदिवासींना लाखोंचे उत्पन्न

| महाड | प्रतिनिधी |

आंबवडे गावातील धरण क्षेत्रात श्रमजीवी सहकारी सामाजिक संस्थेच्या पुढाकारातून मत्स्यशेती प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पांत माशांच्या विविध प्रजातींच्या उत्पादनातून आदिवासी समाजाला हक्काचा रोजगार मिळाला आहे. आदिवासी, कातकरी समाज पारंपरिकरित्या मासेमारी, जंगलातील फळभाज्यांची विक्री, मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात.



महाड व पोलादपूर तालुक्यातील नदी-नाले, जलस्रोत औद्योगिक रसायनांमुळे प्रदूषित आहेत. परिणामी, पारंपरिक मत्स्यव्यवसायावर मर्यादा आल्या असून, आदिवासींना उदरनिर्वाहासाठी झगडावे लागत आहे. विशेष म्हणजे, शासनाच्या विविध योजना असूनही प्रत्यक्ष परिणाम मात्र जीवनमानावर झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे तालुक्यातील फौजी आंबवडे गावातील धरण क्षेत्रात मत्स्यशेतीचा प्रकल्प करण्यात आला आहे. या प्रकल्पाला शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, मच्छीमार सहकारी संस्था, मुंबईच्या महानगर गॅस लिमिटेडचे आर्थिक सहकार्य लाभले असून, तिलापिया माशांबरोबर रोहू, कटला, मृगिल अशा विविध जातींचे प्रयोगशील उत्पादन सुरू आहे.

### संस्थेमार्फत उपक्रम

आदिवासी, कातकरी समाजाकडे स्थावर-जंगम मालमत्ता नसल्यामुळे बँकांकडून कर्ज मिळवणे कठीण आहे. सावकारांकडून घेतलेले कर्ज परतफेडीअभावी आर्थिक परिस्थिती अधिक बिकट बनते. या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संस्थेने समाजासाठी विशेष पतसंस्था स्थापन केली असून, तिच्यामार्फत आदिवासींना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होत आहे. संस्थेमार्फत प्रायोजित शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवले जातात. तसेच, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागास आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

### ९ ते १० लाखांची उलाढाल

तिलापिया माशांचे येथे उत्पादन घेतले जात आहे. १०० ते १५० ग्रॅमपासून दोन किलोपर्यंत वजनाचे मासे किरकोळ बाजारात २०० ते २५० रुपये भावाने विक्री होत आहेत. यातूनच ९ ते १० लाखांची वार्षिक उलाढाल होत आहे. या संस्थेची जबाबदारी विजया पाटेकर सांभाळतात, तर प्रकल्पाचे अध्यक्ष बाळासाहेब कोळेकर, राम आखाडे, व्यवस्थापक विठ्ठल कोळेकर, मंदार जठार, मेधा कदम, आदिवासी समाज संघटना पोलादपूर अध्यक्ष पांडुरंग वाघ, मिथुन मुकणे, पिंटू पठार यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# अग्निशमन वाहन, रुग्णवाहिका उपलब्ध करा

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुका हा रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण तालुका असून येथे अष्टविनायक तीर्थक्षेत्र, ऐतिहासिक स्थळे व निसर्गसंपन्न क्षेत्र आहे. या बरोबरच तालुका दिवसेंदिवस विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. मात्र, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तालुक्यात असलेल्या विविध कंपन्यांनी सीएसआर फंडातून अग्निशमन वाहन व रुग्णवाहिका उपलब्ध कराव्यात, तसेच विकासकांनी देखील यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सुधागड वासियांकडून होत आहे.

अंदाजे ६५ ते ७० हजार लोकसंख्या असलेल्या या तालुक्यात अनेक लघु व मध्यम उद्योग, फार्महाउस, आणि उत्पादन कंपन्या कार्यरत आहेत.

### सुधागड वासियांची मागणी

मात्र, आपत्कालीन सेवा क्षेत्रात विशेषतः अग्निशामक वाहन आणि रुग्णवाहिका यांची कम तरता आजही जाणवते आहे. त्यामुळे आगीच्या किंवा इतर अपघाताच्या दुर्घटना घडल्यास अग्निशमन वाहन व रुग्णवाहिकेची गरज लागते. कारण बऱ्याच वेळा १०८ रुग्णवाहिका ही उपलब्ध नसते. तसेच, खासगी रुग्णवाहिका ही वेळेत उपलब्ध नसतात आणि अधिकचे पैसे देऊन सर्वसामान्य नागरिकांना त्या घेणे परवडत नाही. अशा परिस्थितीत सीएसआर फंडाचा उपयोग करून स्थानिक गरजांसाठी आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज बनली आहे.

# टॉप क्लास शाळांमधील खर्च शासकीय योजनेतून

| रायगड | प्रतिनिधी |

केंद्र शासनाच्या पीएम यशस्वी या योजनेकरिता ईबीसी, डीएनटी प्रवार्गातील इयत्ता ९ वी ते १२ वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थांनी https://scholarships.gov.in/ या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत. तसेच, गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२वीपर्यंत उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी निवडक टॉप क्लास शाळांमध्ये शिकण्यासाठी लागणारा शैक्षणिक खर्च शासकीय योजनेतून मिळणार असल्याची माहिती सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड सुनिल जाधव यांनी दिली आहे.

**याकरिता पात्रता:-**

ओबीसी, ईबीसी, डीएनट्टी प्रवर्गातील विद्यार्थी, वार्षिक कुटुंबीय उत्पन्न कमाल २ लाख ५० हजार असावे, निवड पद्धत मागील वर्गातील गुणांच्या आधारे मेरिट यादी, आरक्षण किमान ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव शाळा निवड सलग वर्षांमध्ये १०० टक्के निकाल देणाऱ्या रायगड जिल्ह्यातील सर्वोत्तम शाळांचीनिवडकेलीली यादी मिळविण्यासाठी सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करून घेणे.

**वर्गनिहाय आर्थिक मदतः-**

इयत्ता ९ वी-१० वी, वार्षिक मदत ७५ हजार, समाविष्ट घटक शुल्क, वसतिगृह शुल्क, परीक्षा फी, पुस्तके, गणवेश, विशेष बाबी ८ वी ९ वीच्या गुणांवर आधारित मेरिट यादी. इयत्ता ११ वी-१२ वी, वार्षिक मदत १ लाख २५ हजार, समाविष्ट घटक शुल्क, वसतिगृह शुल्क, प्रयोगशाळाशुल्क, कोचिंग फी, विशेष बाबी १० वी ११वीच्या गुणांवर आधारित मेरिट यादी.

**अर्ज प्रक्रिया :-**

राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे, शाळा नोडल अधिकारी ऑनलाईन पडताळणी करेल, राज्य सरकारकडून अंतिम मंजूरी, मुलगे व मुलींसाठी स्वतंत्र मेरिट यादी तयार, शिष्यवृत्तीची रक्कम डीबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार.

**अटी व निरीक्षण :-**

आधार लिंक केलेली उपस्थिती प्रणाली आवश्यक, नियमित उपस्थिती व समाधानकारक शैक्षणिक प्रगती आवश्यक, इतर शासकीय योजनेंतर्गत एकाच उद्देशासाठी दुहेरी लाभ घेता येणार नाही.

# एसटी प्रशासनाला आंदोलनाचा इशारा

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

एस.टी. महामंडळातील मागास वर्गीय कर्मचारी व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत एस.टी. प्रशासन उदासीन आहे. त्याबाबत प्रशासनाने प्रलंबीत प्रश्नांची सोडवणूक न केल्यास अशा हुकूमशाही प्रशासना विरूद्ध आंदोलन छेडू. असा इशारा पेण येथे झालेल्या रिपब्लीकन एस.टी. कर्मचारी संघटनेच्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीत संघटनेचे राज्य सरचिटणीस सिताराम कांबळे यांनी आपल्या भाषणात मांडले.

या बैठकीचे अध्यक्षस्थान संघटनेचे राज्य अध्यक्ष अरविंद नागटिळक यांनी भुषविले होते. बैठकीत एस.टी. महामंडळात मागास वर्गीय कर्मचाऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांबाबत, त्यांच्या बढत्या, बदल्या, गोपनीय अहवाल, इतर बाबींची प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. तसेच, महामंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना प्रलंबीत प्रश्नाबाबत निवेदन देण्याचे ठरले. त्याची परिपुर्तता न झाल्यास पुढील आंदोलन करण्याचे धोरण निश्चित केले जाईल असे ही ठरले.

### बैलांची चोरी झाल्याने शेतकऱ्याचे नुकसान

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील पोशिर ग्रामपंचायतमधील चिंचवाडी आदिवासीत एका शेतकऱ्याची जनावरे चोरीला गेल्याची घटना घडली आहे. त्या जनावरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन गाडीमध्ये भरून नेल्याची माहिती समोर येत आहे. याची माहिती मिळताच संबंधीत शेतकऱ्याने तात्काळ कळंब आऊट पोस्ट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. परंतु, पोलिसांनी कोणतीही हालचाल न केल्याने चोरटे ती जनावरे घेऊन पसार झाली आहेत.

# गोंधळपाड्यात रक्तदान शिबीर संपन्न

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील समाजमंदिर येथे मंगळवारी (दि.२३) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंडळाच्या सदस्यांसह परिसरातील तरुणांनी रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तालुक्यातील गोंधळपाडा येथील जयभवानी मित्र मंडळातर्फे सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मंगळवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात सुमारे पंचवीसहून अधिक तरुणांनी रक्तदान केले. रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीचे जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दीपक गोसावी, समाजसेवक अधीक्षक नवनाथ अळ्ळी, अधिपरिचारक रामकुमार निकस, वैभव कांबळे, गणेश भोये, चालक महेश घाडगे, मंगेश पिंगळा यांच्या पथकाने रक्त संकलन केले. रक्तदात्यांना यावेळी जिल्हा रक्तपेढीतर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. तर जयभवानी मंडळातर्फे रक्तदात्यांना नाश्ताची व्यवस्था करण्यात आली होती. मंडळाचे अध्यक्ष मनोज पडियार यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# आत्ता तरी शुद्ध पाणी द्या

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला निवेदन

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

उमटे धरणाच्या पायथ्याशी कोटी रुपये खर्च करून जल शुद्धीकरणाचा प्लांट बसवला आहे; परंतु, तो नावालाच बसवला आहे. कारण पावसाळ्यात दरवर्षी प्रमाणे यंदाही गढूळ पाणी येत होते. जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडे शुद्ध पाण्यासाठी गेल्यानंतर ते जबाबदारी झटकून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे बोट दाखवतात. त्यामुळे उमटे धरणावर अवलंबून असणाऱ्या नागरीकांना पिण्यायोग्य व शुद्ध पाणी पुरवठा करण्याबाबत उमटे




धरण संघर्ष समीतीच्यावतीने ॲड. राकेश पाटील यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता यांना लेखी अर्ज देण्यात आला आहे.

या अर्जामध्ये ॲड पाटील म्हणाले की, उमटे धरणावर ४४ गावे व ३३ आदिवासी वाड्या अवलंबून आहेत. २०२४ साली सामाजिक बांधिलकी जपत्त आम्ही सामाजिक संस्थांनी मिळून उमटे धरणाचा गाळ काढण्याचे काम केले होते. परंतु, येथील गाळ काढण्याचे काम सुरू केल्यापासून ते शेवटपर्यंत आपल्या विभागाचा एकही अधिकारी धरणावर फिरकला नाही. तसेच, धरणाच्या भिंतीला भगदाड पडून धरण फुटण्याच्या परिस्थितीत आहे. उमटे धरणाची मालकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असल्यामुळे हे निवेदन आपल्याला देत असून उमटे धरणातून भर पावसाळ्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही गढूळ पाणी पाजण्याचे काम आपण केले आहात. परंतु, आता पावसाळा संपत्त आला असतानाही उमटे धरणातून आजही गढूळ मातीमिश्रीत पाण्याचा पुरवठा केला जात आहे. धरणाच्या लगत कोटी रूपये खर्च करून पाणी शुद्धी करण्याचे फिल्टर प्लांन्ट बसविले असतानाही पाणी शुद्ध मिळत नाही ही मोठी शोकांतिका आहे. उमटे धरणाचे मुख्य मालक या नात्याने आपण धरणावर अवलंबून असणाऱ्यांना शुद्ध पिण्यायोग्य पाणी पुरवण्याचे काम आपण करावे, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# 'उत्सव नवरात्रीचा जागर नारी शक्तीचा'

| पेण | प्रतिनिधी |

नवरात्री उत्सवाचे औचित्य साधून 'उत्सव नवरात्रीचा जागर नारी शक्तीचा' या अंतर्गत बालविवाह विरोधी जनजागृती मोहिमेची सुरूवात झाली. पेण तालुक्यातील शेवटचे टोक समजल्या जाणाऱ्या घोटे गावातून पोलीस निरिक्षक संदीप बागूल आणि संतोष पाटील यांच्या हस्ते या मोहिमेची सुरूवात करण्यात आली. यावेळी प्रथम आदिवासी समाजाचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य जोमा दरोडा यांनी अभियानासाठी मार्गदर्शक म्हणून आलेल्या सर्वांचे स्वागत केले. त्यानंतर संतोष पाटील यांनी बाल विवाह म्हणजे काय आणि ते करणे किती चुकीचे आहे या बाबत मार्गदर्शन केले.

यावेळी कायदेशीर मार्गदर्शन पेणचे पोलीस निरिक्षक संदिप बागूल यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की, बाल विवाह ही बाब वरुन छोटी दिसत असेल. परंतु, ही गोष्ट छोटी नसून त्याचे गांभीर्य खुप मोठे आहे. यावेळी त्यांनी पोस्को कायद्याअंतर्गत कशी कारवाई होते हे देखील समजावून सांगितले. यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती हरी कृष्णा वाघ, सरपंच हरी वाघ हे उपस्थित होते.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक १०८ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

### मराठवाड्यावरील आस्मानी संकट गडद

**मुंबई :** आधीच पुराने हैराण झालेल्या मराठवाड्यासमोरील संकट आता अधिक गडद होण्याची शक्यता आहे. पुढचे पाच दिवस म्हणजे, २५ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर या दरम्यान राज्यासह मराठवाड्यातील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर २७ सप्टेंबर रोजी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पूरग्रस्तांसाठी सुरू असलेल्या मदतकार्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होणार आहे. सोबतच, चक्रीय स्थिती असल्याने राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २५ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹

आजचा रंग पिवळा



## वेधक

### कांदिवलीत गॅस गळती

**मुंबई :** कांदिवली येथील मिलिटरी मार्गावरील ईइसआयसी रुग्णालयामागच्या एका दुकानात बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास स्वयंपाकाच्या सिलिंडरमधून वायुगळती होऊन भीषण आग लागली. या दुर्घटनेत सातजण होरपळले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेत शिवानी गांधी, नीतू गुप्ता, जानकी गुप्ता, मनराम, रेखा जोशी, दुर्गा गुप्ता, पुनम हे सातजण जखमी झाले. शिवानी, नीतू, जानकी, मनराम यांना ईएसआयसी रुग्णालयात, तर उर्वरित जखमींना बीडीबीए रुग्णालयात नेण्यात आले.

### लक्ष्मण हाके ॲक्शन मोडमध्ये

**बीड :** लक्ष्मण हाके यांचा सहकारी पवन कंवर याच्यावर जीवघेणा हल्ला झाला आणि याच प्रकरणी हाके यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांची भेट घेत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पवन कंवर हे लक्ष्मण हाके यांच्या प्रत्येक आंदोलन आणि सभेदरम्यान सोबत होते. मात्र मध्यरात्री त्यांच्यावर माजलगावच्या ग्रामीण भागात जीवघेणा हल्ला झाला. लक्ष्मण हाके आक्रमक झाले असून आरोपींना अटक न केल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

### सागरी उद्योगाला चालना देण्याचा निर्णय

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत भारताच्या जहाजबांधणी आणि सागरी उद्योगाला चालना देण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. जहाजबांधणी आणि सागरी उद्योगांसाठी तब्बल ६९,७२५ कोटी रुपयांच्या पॅकेजला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. या संदर्भातील माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. या शिवाय जहाजबांधणी विकास योजनेच्या खर्चासाठी १९,९८९ कोटी देण्याची मान्यता देण्यात आली आहे. जहाज बांधणीसह पायाभूत सुविधांना आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

### आदिवासींच्या मूक मोर्चाला हिंसक वळण

**नंदूरबार :** नंदूरबारमध्ये एका हाणामारीत आदिवासी तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेनंतर आता नंदूरबार जिल्ह्यात वातावरण तापले आहे. या हाणामारीत सहभागी असलेल्यावर तसेच तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता केली जात आहे. याच मागणीसाठी अनेक आदिवासी संघटना तसेच हजारो आदिवासी बांधव आक्रमक झाले असून नंदूरबार शहर बंद ठेवण्यात आले आहे.

### दिल्लीतील आश्रमात मुलींचा लैंगिक छळ

**दिल्ली :** धर्माच्या नावाखाली काळे धंदे करणाऱ्या एका स्वयंघोषित बाबाचा पर्दाफाश झाला आहे. एका आश्रमात शिकणाऱ्या १७ विद्यार्थिनींनी आश्रमातील अवैध प्रकार उघडकीस आणले. आश्रम प्रमुख स्वामी चैतन्यानंद सरस्वती उर्फ पार्थसारथी नावाच्या बाबावर महिलांशी गैरवर्तन, छेडछाडीचे आरोप करण्यात आले आहेत. १७ विद्यार्थिनींनी या बाबावर लैंगिक छळाचे आरोप केले आहेत.

## जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका

# दिवाळीनंतर वाजणार बार?

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या गट व गणनिहाय अंतिम मतदार याद्या २७ ऑक्टोबरपर्यंत प्रसिद्ध करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ३२ जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. दिवाळीनंतर मतदार याद्या अंतिम होणार असल्याने प्रत्यक्ष निवडणूक नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरमध्ये होण्याची दाट शक्यता आहे. तब्बल साडेतीन तीन वर्षाहून अधिक काळ प्रशासक असणाऱ्या रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधून लवकरच लोकप्रतिनिधींचा वरचष्मा पहावयास मिळणार आहे. जिल्ह्यातील ५९ जिल्हापरिषद गट आणि ११८ पंचायत समिती गणामध्ये दिवाळी नंतर निवडणुकीचा धुरळा उडणार असून प्रचाराच्या मिरवणुकांचे बार वाजणार असल्याचे संकेत मिळत आहेत.**




### प्रशासन अलर्ट

- राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुका
- २७ ऑक्टोबरपर्यंत अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश
- प्रत्यक्ष निवडणूक नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरमध्ये होण्याची दाट शक्यता
- विधानसभा मतदारसंघाची १ जुलै २०२५ ची मतदार यादी विचारात घेतली जाणार
- मतदार यादी व मतदान केंद्रे जाहीर झाल्यावर निवडणुकीची तारीख होणार जाहीर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला दिला आहे. त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली आहे. त्रिस्तरीय निवडणुकीत ३२ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत येणाऱ्या ३३६ पंचायत समित्यांची निवडणूक पहिल्या टप्प्यात घेतली जाईल. त्यानंतर नगरपालिका व अंतिम टप्प्यात महानगरपालिकेच्या निवडणुका होणार आहेत.

जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या दृष्टीने ग्राम विकास विभागाने जिल्हा परिषदेच्या गटाची व पंचायत समितीच्या गणांची प्रभाग रचना नुकतीच पूर्ण केली आहे. आता मतदार यादीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने पूर्ण करण्याचा

पान ७ वर

## शिधापत्रिका इष्टांक घटण्याचा धोका

**लाभार्थी वंचित राहू नये यासाठी कार्यवाही करण्याची मागणी**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये अंत्योदय अन्न योजनेच्या दोन हजार १०७ शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंब योजनेच्या तब्बल ७० हजार ४४२ लाभार्थींचा इष्टांक वापरात नाही. त्यामुळे हा इष्टांक कपात होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे लाभार्थी वंचित राहून नये म्हणून प्रशासनाने कार्यवाही करावी अशी रायगड जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार कल्याणकारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांना मंगळवारी(दि.२३) निवेदन देण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यात एकूण १५ तालुके, एक हजार ८६० वस्ती असलेली महसुली गावे आहेत. जिल्ह्यात एक महानगरपालिका, १० नगरपरिषदा, ६ नगरपंचायती व ८११ ग्रामपंचायती आहेत. ग्रामीण भागात ७६.३२ टक्के व शहरी भागात ४५.३४ टक्के लोकसंख्या अन्नसुरक्षेसाठी पात्र आहे. त्यानुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या (जनगणना २०११ नुसार) २६ लाख ३५ हजार ३९४ आहे. त्यापैकी ग्रामीण भागाची १२ लाख ६८

पान ७ वर

### लाभार्थी निवड प्रक्रिया गतिमान करावी

**जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी ई-केवायसीचे प्रमाण कमी होईल. या भीतीपोटी पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांकडून शिधापत्रिकेमध्ये नवीन नावे समाविष्ट केली जात नाहीत. महास्वराज्य अभियान अंतर्गत सेवा पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर एखादे नाविन्यपूर्ण विशेष शिबीर राबवून लाभार्थी निवड प्रक्रिया गतिमान करावी, अशी मागणी संघटनेची आहे.**

## लाडकी बहीण योजना वादात

**तांत्रिक बिघाडामुळे केवायसीचा सावळा गोंधळ**

**प्रमोद जाधव**

**। रायगड जिल्हा ।**

लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परंतु केवायसीचा सावळा गोंधळ समोर आला आहे. शासनाची अधिकृत वेबसाईट सतत बंद होत आहे. तांत्रिक बिघाडामुळे लाडकी बहीण योजना वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी २०२४ मध्ये लाडकी बहीण योजना महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात आली होती. अंगणवाडी सेविकांच्या मदतीने महिलांचे अर्ज भरून घेण्यात आले होते. शिधापत्रिका, आधारकार्ड आदी कागदपत्रे अपलोड करून महिलांचे अर्ज भरण्यात आले होते. गतवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे जमा करण्यात आले. तेव्हापासून या योजनेला सुरुवात झाली. दर महिन्याला दीड हजार रुपये खात्यात जमा होत असल्याने महिलांमध्येदेखील आनंद निर्माण झाला. रायगड जिल्ह्यातील आठ लाखहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला होता.

आता मात्र ही महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना संशयाच्या भोवऱ्यात सापडू लागली आहे. मागील महिन्यात जिल्ह्यातील ६० हजार बहिणींची पडताळणी करण्यात आली होती. आता या योजनेतील लाडक्या बहिणींना योजनेचा लाभ घेण्यासाठी ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील सर्व लाभार्थ्यांना मिळणारे हप्ते अधिक सुलभ, सुकर व पारदर्शक व्हावेत यासाठी केवायसी प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनी येत्या दोन महिन्यांत शासनाच्या ladkibahin.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन केवायसी करणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींची केवायसी करण्यासाठी धावाधाव सुरु झाली आहे. काही ठिकाणी इंटरनेटची समस्या निर्माण होत आहे. तर काही ठिकाणी अधिकृत संकेतस्थळ

पान ७ वर

### केवायसीसाठी दोन महिन्याची मुदत

लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी बंधनकारक केले आहे. याची प्रक्रिया सुरू झाली आहे. एकाच वेबसाईटवर केवायसीचे काम केले जात असल्याने तांत्रिक बिघाड निर्माण झाले आहे. एरर दाखवले जात आहे. केवायसीसाठी दोन महिन्याची मुदत देण्यात आली आहे.

## अवैध गावठी दारु अड्ड्यांवर छापा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एक हजार ४६ गुन्हे दाखल केले असून ९५८ जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून तीन कोटी ३० लाख ९० हजार २६३ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. बेकायदेशीररित्या गावठी दारु विक्री, वाहतूक व निर्मिती करणाऱ्या अड्ड्यांवर छापे टाकून दणका देण्यात आला आहे.

अवैध गावठी दारु विक्री, वाहतूक व निर्मितीला बंदी असतानादेखील रायगड जिल्ह्यामध्ये अलिबाग तालुक्यासह कर्जत, रोहा, अशा अनेक तालुक्यात खुलेआमपणे गावठी दारु तयार करण्यापासून विकणे, त्याची वाहतूक करण्याचा प्रकार केला जातो. धरण, तलाव, ओढा, खाडीकिनारी लगत जंगल व झुडपांच्या आडोशाला राहून गावठी दारू तयार

पान ७ वर



- **रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने केली कारवाई**
- **तीन कोटी ३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त**

## बनावट नोटांच्या रॅकेटचा पर्दाफाश

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

बाजारात बनावट चलनी नोटांचा वापर करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. गोरेगाव पोलिसांसह स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने संयुक्त कारवाई करीत माणगाव, श्रीवर्धन व म्हसळामधील तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून पाचशेच्या चार आणि दोनशेची एक अशा एकूण पाच नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

माणगाव तालुक्यातील टेमपाले येथील मुफस्सिर उर्फ मिन्नी अब्दुल रशिद खानदेशी यांच्या घरात बनावट चलनी नोटा असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. गोरेगाव पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने संयुक्त छापा टाकला. त्यावेळी खानदेशी याच्या घरात बनावट

पान ७ वर

## रेवदंडा परिसरात कांदळवनावर डल्ला

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

चौल-रेवदंडा परिसरात कांदळवनावर बेकायदेशीर भराव टाकून पक्के बांधकाम उभारले जात असून, या गैरकृत्याबाबत स्थानिक ज्येष्ठ नागरिक जगदीश लांगी यांनी केलेल्या तक्रारीनंतरही शासन व प्रशासनाचे अधिकारी जाणीवपूर्वक कानाडोळा करीत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.



कांदळवन संरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी स्थापन केलेल्या समित्यांचे नियम, तसेच पर्यावरण (संरक्षण) कायद्यांतर्गत होणारी कडक कारवाई या सर्वांना शासन व महसूल खात्याने सरळ पायघड्या घातल्याचे रेवदंड्यातील प्रकाराने उघड झाले आहे.

चौल गट नं. २६८८ या सामाईक सर्वेक्षणात अनेक खातेदार असून, सर्वांनी मिळून भराव टाकल्याचे दस्तऐवज व फोटो पुरावे आहेत. तरीसुद्धा महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांनी फक्त एका खातेदाराच्या नावावर दाखल करून उर्वरित भूमाफियांना वाचविण्याचा प्रयत्न केला. वारंवार तक्रारी करूनही मंडळ अधिकारी चौल, तलाठी, तहसीलदार विक्रम पाटील, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी अनधिकृत बांधकामांना थांबवण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे सरळ प्रश्न उपस्थित होतो. कोणत्या राजकीय दबावाखाली हे अधिकारी काम करत आहेत. शासनाची परवानगी न घेता झालेल्या भराव व बांधकामांकडे डोळेझाक करून महसूल खात्याने थेट शासनाची फसवणूक

पान ७ वर

- **लांगी यांची कारवाईची मागणी**
- **प्रशासनाचे जाणिवपूर्वक होतेय दुर्लक्ष**

### कुंडलिकेत रसायन सोडून चालकाचे पलायन

**। रोहा/धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा कोलाड रस्त्यावर रस्त्यालगत भरदिवसा एका अज्ञात टँकर चालकाने आरोग्यास घातक असलेले रसायन टँकर रस्त्यालगत उभे करून रसायन नजिकच्या कुंडलिका नदीपात्रात सोडले आहे. दरम्यान यातील काही रसायन हे रस्त्यावरच पडले असल्याने रस्त्यावरून रहदारी करणाऱ्या वाहनचालकांसह पादचारी वर्गाला याचा प्रचंड त्रास जाणवत आहे. दिवसाढवळ्या रस्त्यालगत कुंडलिका नदी पात्रात टँकरमधील रसायन सोडल्याच्या घटनेने या परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. या घटनेचा तपास कोलाड

पान ७ वर

**प्रवाशांची होणार गैरसोय | शनिवारपासून सुरळीत होणार प्रवास**

## ओहोटीचा मोरा-मुंबई जलसेवेला फटका

**। उरण । प्रतिनिधी ।**

मोरा बंदरातील गाळामुळे ओहोटीच्या काळात आज बुधवारी २३ सप्टेंबरला दुपारी ५.३० ते ८.४५ दरम्यान तर २४ ला ६ ते ८.३० आणि २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८.३० वाजता ही सेवा बंद ठेवण्यात आली आहे. शनिवारीपासून ही जलसेवा सुरळीत होणार आहे.

मोरा मुंबई जलमार्गावरील प्रवासी आणि बोट मालकांच्या सातत्याने केलेल्या मागणीनंतर ३ कोटी रुपये खर्च करून मोरा बंदरातील गाळ काढण्यात आला आहे. यामुळे ओहटीमुळे या मार्गावरील प्रवासी बोटी गाळात रुतल्याने प्रवाशांना प्रतीक्षा करावी लागत होती. या मार्गाने वर्षाला तीन लाखापेक्षा अधिक प्रवासी प्रवास करीत आहेत. या कामामुळे उरण-भाऊचा धक्का गाळात रुतलेली प्रवासी जलसेवा सुरळीत होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मोरा बंदरात गाळाची समस्या आहे. बंदरातील गाळाच्या कायमच्या समस्येमुळे समुद्राच्या ओहोटीमुळे ठराविक कालावधीसाठी प्रवासी वाहतूक सेवा बंद ठेवण्यात येते.कधीकधी चार-पाच दिवस प्रवासी वाहतूकच बंदच ठेवण्यात

पान ७ वर

### गाळाची समस्या दूर करण्याची मागणी

दोन वर्षांपूर्वी चार कोटी रुपये खर्चून मोरा बंदरातील गाळ काढण्यात आला होता. त्यानंतरही मोरा बंदर गाळाने भरायचे अद्यापही थांबलेले नाही. मोरा बंदरातील साचत असलेल्या गाळाची समस्या कायम स्वरुपी दूर करण्यासाठी प्रवासी, मुंबई जलवाहतूक संस्था, लॉन्च मालकांकडून सातत्याने मागणी केली जात होती. अखेर बंदर विभागाने संबंधितांकडून केलेल्या मागणीची दखल घेतली आहे. तीन दिवसांपासून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती नितीन कोळी यांनी दिली आहे. तर गाळाची समस्या दूर झाल्यानंतर या सागरी मार्गावरुन वर्षभर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.





# ओला दुष्काळ जाहीर करा

एरवी उन्हाळ्याच्या झळा आणि पाण्याची भयानक टंचाई झेलणाऱ्या मराठवाड्यावर यंदा ओल्या दुष्काळाचे संकट कोसळले आहे. सरकार अजूनही शब्दच्छल करून हा ओला दुष्काळ नाही असे दाखवत असले तरी गेल्या चार दिवसात भीमा व गोदावरीच्या खोऱ्यात जे काही झाले आहे ते अतिवृष्टी या शब्दात मावणारे नाही. हजारो हेक्टर शेतीमध्ये घुसलेले पाणी, पिकांची नासाडी आणि पूर्णपणे खरडून गेलेली माती असे या भागाचे चित्र आहे. सरकारने ३१ लाख ६२ हजार शेतकऱ्यांसाठी २२१५ कोटींची मदत जाहीर केली आहे. सरासरी हिशेबानुसार ती माणशी ७ हजार रुपये इतकी येते. मात्र अनेकांची घरेदारे, चीजवस्तू वाहून गेल्या असून शेतीचा हंगाम ही पार बुडाला आहे. त्यामुळे त्यांच्या मदतीसाठी कितीतरी अधिक रक्कम लागेल. शिवाय याच पैशांमधून समाईक रस्ते, बांधबंदिस्ती इत्यादींची तात्पुरती दुरुस्ती केली जाईल. त्यामुळे प्रत्यक्ष लोकांच्या हाती यातला किती पैसा लागेल हे पाहावे लागेल. त्यातही यामध्ये सरकारी पक्षाशी संबंधित असल्याने हात मारणारे, कंत्राटदार, सरकारी अधिकारी हे असतीलच. हा भ्रष्टाचार होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. शिवाय ही केवळ पैशातील भरपाई आहे. त्याने त्यांची घरे किंवा शेती एका दिवसात पूर्वीसारखी होऊ शकणार नाही याचे भान ठेवावे लागेल. त्यामुळेच विरोधक ओल्या दुष्काळाची मागणी करीत आहेत. तसे झाले तर त्या भागातील शेतकऱ्यांची कर्जे वा त्यावरील व्याज माफ होऊ शकेल. शिवाय विद्यार्थ्यांची फी माफ करता येईल. त्यांना इतरही मदत देता येईल. पण सरकार मात्र त्याला तयार नाही. एनडीआरएफच्या निकषानुसार एकरी जेमतेम ३४०० रुपये मदत दिली जाण्याची शक्यता आहे. एका एकरातील सोयाबीन, कापूस किंवा अन्य कोणत्याही पिकाचा उत्पादनखर्चच सुमारे वीस हजारांच्या आसपास असतो. तेवढाही शेतकऱ्यांना मिळणार नसेल तर त्यांचे दिवाळेच वाजेल. शिवाय हा फक्त झालेला खर्च भरून दिला जाईल. पण त्यातून मिळणाऱ्या संभाव्य उत्पन्नाची भरपाई यातून होतच नाही.

## नोकरशहा नव्हे मंत्र्यांनी ठरवावे

आजकाल शहरांमध्ये चार माणसांच्या कुटुंबाचा एका महिन्याचा खर्च किमान २५ ते ३० हजार रुपये असतो. जेमतेम तितकी रक्कम शेतकऱ्यांच्या हातावर टेकवून त्याची बोळवण केली जाणार असेल व पुढचे सर्व वर्ष त्याने तितक्या पैशांवर काढावे असे सरकारचे म्हणणे असेल तर त्याचा निषेध करायला हवा. ओला दुष्काळ जाहीर करण्याची सरकारची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. पाणी साचल्याने पिकांचे ३३ टक्के नुकसान झाले तरच ओला दुष्काळ जाहीर होतो. त्यासाठी गावातल्या पीक आणेवारी समित्यांचे अहवाल महत्वाचे असतात. गावाची आणेवारी ५० टक्क्यांहून कमी आली व गावाच्या जीवनावर परिणाम झाला, म्हणजे, लोकांना खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर करणे भाग पडले तरच दुष्काळ जाहीर होतो. काल-परवाचा मराठवाड्यातला पूर व नुकसान या निकषांमध्ये बसते की नाही हे मंत्रालयात एसी केबिनमध्ये बसणारे व आठव्या वेतन आयोगाची वाट पाहणारे बाबू लोक ठरवणार. ते अहवाल कसे खरडणार यावर सर्व काही अवलंबून राहणार. यावेळी ते होऊ देता कामा नये. विरोधकांनी हस्तक्षेप करून मंत्र्यांना निर्णय घ्यायला भाग पाडले पाहिजे. एरवी कोकणासारख्या पावसाच्या प्रदेशाला अतिपावसाचे संकट झेलण्याची थोडीफार सवय असते. पण मराठवाड्यासारख्या सदैव दुष्काळी प्रांताला थोडा पाऊसही भारी पडतो. २०१२ ते २०१९ या सात वर्षांमध्ये मराठवाड्यामध्ये चार वेळा दुष्काळ किंवा अवर्षणाची स्थिती निर्माण झाली. आधीच मराठवाड्यात पाऊस कमी. पण त्या कमी पावसाच्याही केवळ ५० ते ६० टक्केच पाऊस या दुष्काळाच्या काळात झाला. यंदा मात्र याच भागात जागोजागी ढगफुटीसदृश पाऊस झाला आहे. मुळात पाऊस सुरू झाला तोच लवकर. साधारण १५ मेच्या सुमाराला. त्यानंतर मराठवाड्यातील ४८३ मंडलांपैकी ११३ मंडलांमध्ये तीन वेळा अतिवृष्टी झाली. जुलै व ऑगस्टमध्ये नांदेड व लातूरला जोरदार तडाखा बसला. असे म्हणतात की यंदा एकही नदी वा ओढा असा शिल्लक राहिला नाही की त्याला पूर आला नाही. कालच्या पावसात गोदावरी, सीना, सिंदफणा, मांजरा अशा सर्वच नद्यांचे पाणी पात्रे सोडून शेतात घुसले. अनेक छोटे तलाव, बंधारे वाहून गेले.

## परतीच्या वाटेवर हैदोस

पुणे जिल्ह्याच्या पूर्वेला मान्सूनचा जोर क्रमाक्रमाने ओसरत जातो हा नेहमीचा अनुभव आहे. त्यामुळे नगर जिल्हा व बालाघाटच्या डोंगरापलिकडचे बीड, जालना, औरंगाबाद, परभणी, लातूर इत्यादींना अतिशय कमी पाऊस मिळतो. पण यंदा सप्टेंबर महिन्यात म्हणजे पाऊस परतीच्या वाटेवर असतानाच्या काळात तिथे हाहाकार माजला. बीड व धाराशिव या जिल्ह्यांमध्ये इतका कहर झाला की तिथे लोकांच्या मदतीसाठी लष्कर बोलवावे लागले. सोलापूर जिल्ह्यात पाऊस थोडा पण पूर अधिक अशी स्थिती आली. कारण नगर जिल्ह्यातून वाहत येणाऱ्या सीना नदीच्या खोऱ्यात इतका प्रचंड पाऊस झाला की तिचे मोहोळ, माढा इत्यादी भागातील पात्र फुगले व हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली. पंढरपूरला तर यंदा जवळपास तिसऱ्यांदा फटका बसला. धाराशिव हा कायमचा दुष्काळी जिल्हा तिथे सरासरी साडेपाचशे मिलीमीटर पाऊस पडतो. पण तिथे यंदा १४० टक्के म्हणजे ८२५ मिलीमीटर पाऊस झाला. बीड जिल्ह्यात माजलगाव, गेवराई वगैरे भागांमध्ये काही तासांच्या अवधीत १६० मिलीमीटर पाऊस झाला. ही ढगफुटीच होती. कारण पूर्ण हंगामात मिळून जितका पाऊस होतो त्याच्या २५ टक्के पाऊस या अवघ्या बारा तासात झाला. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव व धुळे भागातही असाच कहर झाला. या सर्व भागांमध्ये केळी, भाजीपाला, मका, ऊस, कापूस, तूर, मूग, हरभरा व कडधान्ये अशा विविध पिकांचे नुकसान झाले. याचे परिणाम आपल्याला पुढच्या काळात या सर्व वस्तूंच्या भाववाढीमधून दिसतील. पण शेतकऱ्यांचे झालेले नुकसान त्याहून कित्येक पटीने अधिक असेल. यंदाच्या हंगामात अनेकांना दुबार पेरण्या कराव्या लागल्या आहेत. आता तिसऱ्यांदा पेरण्या करण्याची आर्थिक ताकद व उमेद त्यांच्याकडे शिल्लक असणे शक्य नाही. त्यामुळे सर्व समाजाने व मुख्यतः सरकारने त्यांना हात द्यायला हवा. नवरात्राच्या पहिल्या दिवसापासून जीएसटीचे दर कमी झाले. कालपर्यंत दहा रुपयांना मिळणारी वस्तू आता नऊ रुपयांना मिळू लागली. त्यामुळे लोकांची खूप मोठी बचत होणार आहे असा गाजावाजा सरकारने चालवला आहे. नरेंद्र मोदी यांनी तर स्वतः राष्ट्राला उद्देशून भाषण केले. पण मुळातच प्रचंड वाढलेल्या भावांमध्ये किरकोळ कपात झाली म्हणून बचत होत नसते. आता बचतीचे उत्सव साजरे करणारे सरकार मराठवाड्यातील शेतकऱ्यांना काय सांगणार व त्यांच्यासाठी काय करणार हे पाहावे लागेल.

विचार

# निकोबार द्वीपसमूहाचा व्यूहात्मक विकास

**केंद्र सरकारने अंदमान निकोबार बेट समूहाचा विकास करण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. या बेटाचे भौगोलिक स्थान लक्षात घेऊन केला जात असलेला विकास संरक्षणात्मक दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या प्रकल्पाला काँग्रेस पक्षाने विरोध केला आहे. तो डावलायचा तर या द्वीपसमूहाचे पर्यावरण आणि तिथल्या दुर्मिळ होत चाललेल्या जातीसमूहाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.**



प्रा. सुखदेव बखळे

गेल्या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारने अंदमान आणि निकोबार बेटांना भारताच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वाचे स्थान बनवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा उद्देश हा आहे, की या बेटाने भारताच्या पूर्व भागात सुरक्षा कवचासारखे काम करावे आणि 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात भारताच्या हितांचे रक्षण करावे. यासाठी सरकारने येथे अनेक मोठी कामे केली आहेत. विमानतळ आणि बंदर सुधारण्यावर भर दिला आहे. सैन्यासाठी राहण्याची जागा बांधण्यात आली आहे. देखरेखीसाठी मजबूत यंत्रणा बसवण्यात आल्या आहेत, ग्रेट निकोबार बेटावर एक मोठा बदल केला जात आहे. त्यात एक नवीन आंतरराष्ट्रीय बंदर, एक नवीन विमानतळ, एक टाउनशिप आणि एक गॅस आणि सौर-आधारित पॉवर हाऊस बांधणे समाविष्ट आहे; परंतु या विकासामुळे काही समस्यादेखील उभ्या रहात आहेत. चीनच्या वाढत्या नौदल शक्तीमुळे बंगालच्या उपसागराचे महत्त्व वाढले आहे; परंतु नागरी समाज आणि वन्यजीव तज्ज्ञ या प्रकल्पांना विरोध करत आहेत. त्यांच्या मते यामुळे येथील स्थानिक लोकांचे, विशेषतः शोम्पेन जमातीचे नुकसान होईल. याचा येथील प्रवाळ खडकांवर आणि सागरी जीवनावर वाईट परिणाम होईल. निकोबारमधील मेगापोड पक्षी आणि लेदरबॅक कासवांसारख्या धोक्यात असलेल्या प्रजाती धोक्यात येतील. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी या प्रकल्पाबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यांनी येणाऱ्या पर्यावरणीय आणि आदिवासी आपत्तीचा इशारा दिला आहे. निकोबारी लोक विकासक्षेत्रात असलेल्या त्यांच्या वडिलोपार्जित गावांमधून कायमचे विस्थापित होतील. या विकास प्रक्रियेत साडेआठ लाख ते ५८ लाख झाडांचा बळी देण्यात आला आहे. असे असले, तरी ग्रेट निकोबार प्रकल्पाचे सामरिक महत्त्व विसरता येणार नाही. पर्यावरण, संरक्षणात्मक महत्त्व, आदिम जाती-चे अस्तित्त्व याचे संतुलन साधून विकास केला पाहिजे. ग्रेट निकोबार प्रकल्प हा बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील बेटासाठी प्रस्तावित केलेला एक मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्प आहे. ग्रेट निकोबार बेटावर बंदर, विमानतळ, वीज आणि टाउनशिप सुविधा बांधण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणारी ही एक धोरणात्मक आणि पायाभूत सुविधा योजना आहे. त्यामुळे भारताची सागरी सुरक्षा आणि व्यापार वाढेल. या प्रकल्पाला २०२२ मध्ये पर्यावरणीय आणि वन मंजुरी मिळाली. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ८१ हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. 'नीती आयोगा'च्या नेतृत्वाखाली आणि अंदमान आणि निकोबार बेटे एकात्मिक विकास महामंडळाद्वारे अंमलात येत असलेला हा प्रकल्प ग्रेट निकोबारला धोरणात्मक, आर्थिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या केंद्रात रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. जगातील सर्वात व्यस्त शिपिंग लेनपैकी एक असलेल्या मलाक्का सामुद्रधुनीजवळ असलेल्या ग्रेट निकोबारच्या भौगोलिक स्थानाचाही मोठा फायदा होईल. येथे ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधला जात आहे. नागरी आणि संरक्षणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेल्या या विमानतळाची क्षमता २०५० पर्यंत येथे सुमारे चार हजार प्रवासी क्षमता असेल, असा अंदाज आहे. तीन ते चार लाख लोकसंख्येचे सुनियोजित शहर असेल. त्यात निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक जागा असतील. गॅस आणि सौर-आधारित वीज प्रकल्प, तसेच रस्ते, पाणीपुरवठा आणि सहाय्यक पायाभूत सुविधा तिथे निर्माण केल्या जातील.

ग्रेट निकोबार प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा आणि व्यापारासाठी महत्त्वाचा नाही, तर त्याचे भारतासाठी राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक महत्त्वदेखील आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ असल्यामुळे त्याचे धोरणात्मक स्थान महत्त्वाचे आहे. ग्रेट निकोबार सहा अंश अक्षांशाजवळ आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ एक महत्त्वाचा मार्ग आहे. तिथून जागतिक व्यापाराच्या ३०-४० टक्के आणि चीनची बहुतेक ऊर्जा आयात होते. ट्रान्सशिपमेंट पोर्ट आणि विमानतळ विकसित करून भारत जगातील सर्वात व्यस्त आणि सर्वात महत्त्वाच्या 'चोक पॉइंट'पैकी एकाद्वारे सागरी वाहतुकीचे निरीक्षण आणि संरक्षण करू शकतो. यामुळे हिंद महासागरात चीनची उपस्थिती संतुलित करण्याची भारताची क्षमता वाढते. बीजिंगच्या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाविरुद्ध या प्रकल्पाचा वापर केला जाणार आहे. त्यात हिंद महासागरात बंदरे आणि सुविधांचे जाळे तयार केले जाणार आहे. हे नियोजित दुहेरी वापराचे आंतरराष्ट्रीय विमानतळ नागरी आणि संरक्षण दोन्ही उद्देशांसाठी काम करेल. त्यामुळे भारताच्या एकमेव त्रि-सेवा कमांड असलेल्या अंदमान आणि निकोबार कमांडमध्ये नौदल आणि हवाई दलाची जलद तैनाती शक्य होईल. यामुळे अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील प्रमुख सागरी क्षेत्रांवर भारताची देखरेख मजबूत होईल. चीनने म्यानमार, श्रीलंका आणि पाकिस्तानमधील ग्वादर, हंबनटोटा आणि क्युकप्युसारख्या बंदरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ग्रेट निकोबारमधील जागतिक दर्जाचे भारतीय बंदर प्रादेशिक आणि जागतिक शिपिंगसाठी चिनी बंदरांना पर्याय तयार होईल. 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात लॉजिस्टिक्स हब म्हणून भारताची भूमिका वाढवेल आणि प्रदेशात भू-राजकीय किंवा लष्करी तणावाच्या बाबतीत भारताला फायदा देईल. या भागात बंदर आणि सहाय्यक पायाभूत सुविधांमुळे शिपिंग मार्गांचे निरीक्षण, ट्रॅक आणि नियंत्रण करण्याची भारताची क्षमता सुधारेल. यामुळे 'क्वाड' सुरक्षा उपक्रमांमध्ये (अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासह) भारताची भूमिका बळकट होईल आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशात मुक्त आणि खुले नेव्हिगेशन सुनिश्चित होईल. हा संपूर्ण प्रकल्प पुढील ३० वर्षांमध्ये उभा राहील. या प्रकल्पात आतापर्यंत टप्प्याटप्प्याने कामे चालू आहेत. 'एनटीपीसी'ने या वर्षी एप्रिलमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पासाठी निविदा मागवल्या होत्या तर गेल्या वर्षी सप्टेंबर २०२४ मध्ये गॅलाथिया बेला प्रमुख बंदर म्हणून घोषित करण्यात आले. अहवालानुसार, सुमारे एक डझन कंपन्यांनी ते चालवण्यात रस दाखवला आहे. त्याच वेळी टाउनशिप विकासासाठी झाडे मोजण्याचे आणि तोडण्याचे कामदेखील सुरू आहे. या प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी नोव्हेंबर २०२२ मध्येच मिळाली होती. त्याच वेळी, त्याच्या देखरेखीसाठी ८० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. भारतीय नौदलाचा आयएनएस तळ ग्रेट निकोबारमध्ये आहे. या सर्व बाबी लक्षात घेता हा बेट समूह पूर्व हिंद महासागरातील विद्यमान संरक्षण आणि देखरेखीच्या कारवायांना बळकटी देतो. त्याचे भौगोलिक स्थान भारताला आग्नेय आशियाशी अधिक आर्थिक कनेक्टिव्हिटीदेखील प्रदान करते. या बेट गटातील बहुतेक भाग नदी क्रूझिंग, कायाकिंग आणि विविध प्रजातींचे पक्षी निरीक्षण यासारख्या पर्यावरणीय पर्यटन क्रियाकलापांसाठी योग्य आहेत. सध्या, मर्यादित पायाभूत सुविधा आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे ग्रेट निकोबारचा भारतीय मुख्य भूमी आणि आंतरराष्ट्रीय शहरांशी मर्यादित संपर्क आहे. त्यामुळे, सरकारच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे येथील पर्यटनाला चालना मिळेल आणि आसपासच्या देशांपर्यंत चांगल्या प्रकारे पोहोचता येईल.

स्थानिक अर्थव्यवस्थेलाही या प्रकल्पाचा फायदा होईल. ट्रान्सशिपमेंटसाठी भारताचे परदेशी बंदरांवर अवलंबून राहणे अनेक समस्या निर्माण करते. भारतीय बंदरे भारतात किंवा भारतातून येणाऱ्या मालवाहतुकीत दरवर्षी लाखो डॉलर्सचे नुकसान सहन करत असताना, परदेशी बंदरांवर बंदर हाताळणी शुल्क आणि ट्रान्सशिपमेंट खर्च भारतीय व्यवसायांच्या खर्चात भर घालतात. याशिवाय, भारताचे परदेशी बंदरांवरील अवलंबित्व राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करते. या दृष्टिकोनातून ग्रेट निकोबारमधील गॅलाथिया बे पोर्ट प्रकल्पाचे उद्दिष्ट भारतीय व्यापार आणि व्यवसायासमोरील असुरक्षिततेचा सामना करणे हे आहे. मेगा ट्रान्सशिपमेंट पोर्ट दर वर्षी १४ दशलक्ष टीईयू (वीस फूट समतुल्य युनिट्स)पेक्षा जास्त हाताळेल अशी अपेक्षा आहे. ही ट्रान्सशिपमेंट क्षमता ते कोलंबो, सिंगापूर आणि क्लांग बंदरांना पर्यायी बनवते. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय (एमओपीएसडब्ल्यू) या ट्रान्सशिपमेंट पोर्ट प्रकल्पाची देखरेख करते. ते २०२८ पर्यंत पूर्ण होणार आहे. तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरणाला ग्रेट निकोबारमध्ये ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी अधिकृत करण्यात आले आहे. त्याचे उद्दिष्ट वाइड-बॉडी विमाने हाताळणे तसेच कनेक्टिव्हिटी आणि पर्यटकांची हालचाल वाढवणे हे आहे. ग्रेट निकोबारचे धोरणात्मक स्थान कोबाल्ट, निकेल, तांबे आणि मॅंगनीज समृद्ध असलेल्या पॉलिमेटॅलिक नोड्यूलच्या किनारी खाणकामासाठी मोठी क्षमता देते. खनिजांच्या क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त करणे भारतासाठी महत्त्वाचे आहे.

चर्चा आजची

# नवरात्रीतील उपवास आणि अनवाणी चालण्याचे फायदे

संतोष राऊळ

नवरात्रीमध्ये अखंड नऊ दिवस उपवास केला जातो. काही जणं दैवी शक्तीला प्रसन्न करण्यासाठी उपवास करतात, तर काही जण फक्त ट्रेंड म्हणून उपवास करतात. त्यांचा उपवास मात्र नावालाच असतो. उपवासाच्या नावाखाली साबुदाणे, वेफर्स अशा प्रकारचे पदार्थ पोट भरून खात असतात. खरंतर आताच्या पिढीला हेच माहिती नसतं की आपण उपवास का करतो ते. उपवासामुळे एखादी दैवी शक्ती प्रसन्न होईल की नाही माहिती नाही पण आपलं शरीर मात्र शंभर टक्के प्रसन्न होईल हे नक्की.

नवरात्रीचा काळ आपल्याला अंतर्मुखी होऊन स्वतःला नव्या ऊर्जेने भरून घेण्याचा आणि विश्राम करण्याचा देखील असतो. नवरात्री दरम्यान उपवास करण्याने हा आनंद आणि सुखाकडे नेणारा प्रवास सहज होतो. त्यामुळे उपवास हे मनाची अस्वस्थता कमी करून सजगता व आनंद आणत असतात. आयुर्वेदानुसार, उपवासामुळे आपला जठराग्नि जागृत होतो. वाढलेला जठराग्नि आपल्या शरीरातील विषारी द्रव्ये जाळून टाकतो. जेव्हा हे विषारी पदार्थ शरीरातून बाहेर टाकले जातात, तेव्हा शरीरातील आळस आणि जडपणा निघून जातो. शरीरातील सर्व पेशींचे पुनर्नवीकरण होते. म्हणूनच शरीर शुद्ध करण्यासाठी उपवास करणे परिणामकारक ठरते. जेव्हा शरीर शुद्ध बनते तेव्हा मन आणि शरीरातील संबंध दृढ बनतात. त्यामुळे मन शांत आणि निश्चल बनते. परंतु, आपल्यापैकी बरेचजण बहुतेकवेळा भूक लागण्याची वाट पाहत नाहीत. आपले शरीर अन्न पचविण्यासाठी तयार आहे याचे लक्षण म्हणजे भूक लागते. भूक लागण्यापूर्वीच अन्न घेतल्याने आपली पचन संस्था कमकुवत होते. परिणामी ताण आणि अशक्त प्रतिकारक्षमता तयार होते. उपवासामुळे जठराग्नि जागृत होऊन ताण कमी करण्यास व प्रतिकारशक्ती दृढ करण्यास मदत होते. उपवासामुळे मनाची बेचैनी कमी होते तेव्हा अंतर्मुखी होऊन ध्यान करणे सोपे जाते. परंतु, स्वतःला टवटवीत ठेवण्यासाठी पर्याप्त प्रमाणात ताजी फळे व सात्विक अन्न खाणे आवश्यक आहे. उपवासासोबत ध्यान केल्याने आपले सत्व वाढते. सत्व वाढल्यामुळे आपले मन शांत आणि जागृत राहते. परिणामी आपली उद्दिष्टे आणि प्रार्थना जास्त शक्तिशाली बनतात. सत्वाचा बहर आपल्या शरीराला हलके आणि ऊर्जावान बनवतो. आपण जास्त कार्यक्षम बनतो. परिणामतः आपल्या इच्छा पूर्ण होतात आणि आपली कामे सहज पूर्ण होतात. त्यामुळे एखाद्या दैवी शक्तीला खूश करण्यासाठी नाही तर आपले शरीर शुद्ध करण्यासाठी आपण उपवास केला पाहिजे. हे हल्लीच्या पिढीला कळत नाही. जो उपवास करतो त्याची त्यांच्याकडून थट्टा केली जाते. हे चुकीचे आहे. ही थट्टा उपवास करणाऱ्याची नसून स्वतःचीच असते. कारण उपवास करून जो शारीरीक लाभ भेटणार आहे तो थट्टा करणाऱ्यांना मिळत नाही.

तसेच, काही जणं नवरात्रीत चप्पल देखील घालत नाहीत. काही जणं यामागे काय कारण आहे याचा विचार न करणाता ट्रेंड म्हणून देखील या नऊ दिवसांत अनवाणी चालत असतात. त्यांनी देखील या मागचं खरं कारण काय, हे जाणून घेणं गरजेचं आहे. तसेच, उपवास करणाऱ्यांपेक्षा या नऊ दिवसांत चप्पल न घालणाऱ्यांचीच जास्त प्रमाणात थट्टा केली जाते. त्यामुळे थट्टा करणारे शिक्षीत असूनही अशिक्षित असल्यासारखे वागत आहेत. कारण या नऊ दिवसांत चप्पल न घालण्यामागे धार्मिक आणि आरोग्यविषयक कारणे आहेत.

धार्मिक कारणांनुसार, चप्पल न घालता जमिनीवर चालणे हे धरणीमातेशी असलेले नाते घट्ट करते आणि शुद्धतेचे प्रतीक मानले जाते. नवरात्री हा एक पवित्र सण आहे, ज्यामध्ये शुद्धता आणि पवित्रतेचे महत्त्व आहे. चप्पल ही बाहेरील घाण आणि अशुद्धी घेऊन येते, म्हणून ती पवित्र ठिकाणी न घालण्याची परंपरा आहे. जमिनीला 'धरणीमाय' मानले जाते. नवरात्रीच्या काळात चप्पल न घालता जमिनीवर चालल्याने धरणीमातेशी असलेले नाते अधिक घट्ट होते आणि तिला आदर देण्याचा हा एक मार्ग आहे. तसेच, या काळात शारीरिक, मानसिक आणि आत्मिक शुद्धता जपली जाते. त्यामुळे, चप्पल न घालणे हे या शुद्धतेचेच एक अंग आहे.

तसेच, आरोग्यविषयक कारण म्हणजे, चप्पल न घालता चालल्याने पायाच्या तळव्यांना जमिनीचा प्रत्यक्ष स्पर्श होतो, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात. अनवाणी चालल्याने पायांच्या तळव्यांना जमिनीचा स्पर्श होतो, ज्यामुळे एक्यूप्रेशरचा फायदा मिळतो. त्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि रक्तप्रवाह योग्य प्रकारे होतो. तसेच, पायांच्या विशिष्ट बिंदूंना दाब येतो, ज्यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर टाकले जातात आणि शरीराला ताजेपणा जाणवतो. अनवाणी पायांना जमिनीचा स्पर्श झाल्याने नैसर्गिकरित्या शरीरातील विषारी घटक कमी होतात आणि शरीरात एक प्रकारचा उत्साह जाणवतो.

त्यामुळेच नवरात्रीमधील उपवासाचे आणि अनवाणी चालण्याचे एवढे सर्व फायदे असतानाही त्यांची थट्टा केली जाते. ही मोठी शोकांतीका आहे. त्यामुळे अनवाणी चालणाऱ्यांची थट्टा करणारे हे नकळत स्वतःच्याच शरीराची थट्टा करत आहेत. प्रत्येक गोष्टीमागे एक कारण असतं. त्यामुळे स्वतःला झेपत नसेल तर करणाऱ्याला निदान प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

लोकसंसद

## सण - उत्सव काळात नफेखोरी रोखा

गौरी गणपती, नवरात्र, दसरा, दिवाळी असे सण आले की, बाजारात कृत्रिम महागाई निर्माण केली जाते. सण उत्सवात पेढे, बर्फी, मिठाई, नारळ, हार, फुले, फळे, तेल, बेसन, मैदा, साखर अशा वस्तू कृत्रिमरित्या महाग केले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून हे घडत आहे. सण-उत्सव हा भक्तांच्या श्रध्देचा विषय आहे. या श्रध्देचा वापर करून काही व्यापारी नफेखोरी करून स्वतःची तिजोरी भरत आहे. भक्तांच्या भावनेशीच खेळण्याचा हा प्रकार आहे. सण उत्सवात भक्तांच्या भावनेशी खेळून त्यांना लुबाडणाऱ्या या महाभागांना ना देवाची भीती ना कायद्याचा धाक. भक्तांना लुबाडणाऱ्या या लोभी व्यापाऱ्यांमुळे भक्त त्रस्त झाले आहेत. भक्ती आणि शक्तीची देवताही या नफेखोरांना अद्दल घडवत नाही की भक्तांनाही या वस्तूंना पर्यायी प्रतिकात्मक दुसरे काही शोधून ते बनवावे ते उपयोगात आणून रूढ करावे अशी युक्ती देत नाही म्हणूनच या नफेखोरांचे फावते. सण उत्सवात भक्तांना नाडून आर्थिक वसुली करणाऱ्या या वृत्तीला पायबंद घालायला हवा. सरकारने त्यावर गंभीर व्हायला हवे. जे व्यापारी भक्तांच्या भावनेशी खेळून स्वतःची तिजोरी भरत आहेत अशा नफेखोर व्यापाऱ्यांना धडा शिकवलाच पाहिजे. त्यासाठी सरकारने अशा नफेखोर व्यापाऱ्यांवर छापे टाकून त्यांना कडक शिक्षा करावी. भक्तांच्या भावनेशी खेळणारी ही नफेखोर वृत्ती मुळापासून उपटून टाकायला हवी.

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## पुतळ्यांपेक्षा समाजोपयोगी कामे हवीत

तमिळनाडूमध्ये माजी मुख्यमंत्री करुणानिधी यांचा पुतळा उभारण्याच्या प्रस्तावावर सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले. "तुम्ही तुमच्या नेत्यांचा गौरव करायचा असेल तर सार्वजनिक पैशाचा वापर का करता?" असा थेट प्रश्न न्यायालयाने विचारला. हा प्रश्न फक्त तामिळनाडू सरकारलाच नाही तर देशभरातील सर्व सरकारांसाठी लागू होतो. नेत्यांचे पुतळे उभारले जातात खरे पण त्याचा प्रत्यक्ष उपयोग कुणाला होतो? पुतळा उभारल्यावर काही दिवस तो चर्चेत राहतो. नंतर त्याची नीट देखभाल केली जात नाही. जयंती किंवा पुण्यतिथीपुरताच पुतळा फुलांनी सजतो, बाकीच्या दिवशी धूळ, घाण, पक्ष्यांची विष्ठा पुतळ्यावर असते.. काही वेळा पुतळ्याची विटंबना झाली तर समाजात तणाव निर्माण होतो. हे सगळं बघता पुतळे म्हणजे गौरवापेक्षा ओझं वाटतात. सर्वोच्च न्यायालयाने केलेली ही टिप्पणी म्हणजे आपल्याला मिळालेला स्पष्ट इशारा आहे. लोकांचे कराचे पैसे लोकांच्या उपयोगी कामांसाठीच खर्च झाले पाहिजेत, पुतळ्यांसाठी नव्हे.

- दीपक काशिराम गुंडये, वरळी.

दिनविशेष

# जागतिक औषधविक्रेते दिन

जागतिक औषधविक्रेते दिन हा दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त कार्यक्रम आहे. जागतिक आरोग्य सुधारण्यासाठी फार्मासिस्टच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी हा एक समर्पित प्रसंग आहे. हा विशेष दिवस मानवी कल्याण वाढवण्यात फार्मासिस्ट किती महत्त्वाची भूमिका बजावतात ते अधोरेखित करतो आणि त्यांच्या अमूल्य कार्याबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. फार्मासिस्टची भूमिका फार्मासिस्ट हे केवळ औषधांमध्येच तज्ज्ञ नसतात, तर ते आरोग्य सेवा प्रणालीचे महत्त्वाचे आधारस्तंभ देखील असतात. त्यांचे काम केवळ औषधे देणे नसून रुग्णांना त्यांच्या आरोग्याबाबत योग्य माहिती देणे, त्यांना औषधांच्या योग्य वापराबाबत जागरूक करणे आणि आरोग्य शिक्षण देणे हे आहे. जागतिक आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यात फार्मासिस्टचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

जागतिक आरोग्य आव्हाने सध्या अनेक आरोग्यविषयक आव्हाने आहेत, जसे की साथीचे रोग, असंसर्गजन्य रोग, मानसिक आरोग्य समस्या आणि मादक पदार्थांच्या गैरवापराची वाढती समस्या. या सर्व समस्या केवळ डॉक्टर किंवा रुग्णालये सोडवू शकत नाहीत. यामध्ये फार्मासिस्टचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. ते केवळ औषधे व्यवस्थापित करण्यातच मदत करत नाहीत तर रुग्णांना निरोगी राहण्यासाठी कोणती पावले उचलावी लागतील याची माहिती देतात. आरोग्य शिक्षणात योगदान फार्मासिस्टचे महत्त्वाचे कार्य आरोग्य शिक्षण देणे आहे. ते रुग्णांना त्यांच्या आरोग्याबाबत जागरूक करण्यात मदत करतात. औषधांचा योग्य वापर, त्यांचे डोस आणि संभाव्य दुष्परिणामांविषयी माहिती देणे ही फार्मासिस्टची जबाबदारी आहे. अशा प्रकारे, ते रुग्णांना सक्षम करतात, त्यांना त्यांच्या आरोग्यासाठी चांगले निर्णय घेण्याची परवानगी देतात.

महामारीच्या काळात फार्मासिस्टची भूमिका कोविड-१९ महामारीने फार्मासिस्टचे काम किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे. त्यांनी केवळ लसीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली नाही तर महामारीच्या काळात औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यातही मदत केली. फार्मासिस्टनी रुग्णांना COVID-१९ ची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचार पर्यायांबद्दल माहिती दिली. करोनाच्या काळात ज्या घटकाची फारशी चर्चा होत नाही किंवा करोनायोद्धा म्हणून ज्यांच्या वाट्याला फार सन्मान वैगरे येत नाही, ते म्हणजे औषधविक्रेते. कोरोनाने सर्वत्र दहशत पसरवली असतानाही औषधविक्रेते मात्र दिवस-रात्र सेवा देत होते. अशा प्रकारे, त्यांनी एक महत्त्वाची आरोग्य सुविधा म्हणून काम केले. तांत्रिक प्रगती आणि फार्मासिस्ट सध्याच्या डिजिटल युगात, तंत्रज्ञानातील प्रगतीचा फार्मासिस्टच्या कार्यपद्धतीवरही परिणाम झाला आहे. फार्मासिस्ट आता ई-आरोग्य सेवा, टेलिमेडिसिन आणि डिजिटल हेल्थ प्लॅटफॉर्मद्वारे रुग्णांशी नवीन नाते प्रस्थापित करत आहेत. ही तांत्रिक प्रगती त्यांना जागतिक आरोग्य गरजा पूर्ण करण्यास अधिक सक्षम बनवते. जागतिक आरोग्य सेवा प्रणालींची मागणी वाढत असताना, उच्च पात्र आणि जुळवून घेण्यायोग्य फार्मासिस्टची आवश्यकता देखील वाढत आहे. एकंदरीत, जागतिक आरोग्य सेवा गरजा पूर्ण करण्यासाठी ते अत्यंत महत्त्वाचे आहेत, विशेषतः आरोग्यसेवेची मर्यादित उपलब्धता असलेल्या वंचित समुदायांमध्ये. थोडक्यात, जागतिक फार्मसी दिन हा आपल्या सामान्य आरोग्य आणि सुरक्षितता राखण्यात फार्मासिस्टच्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल आपल्याला चांगली माहिती देतो. आधुनिक आरोग्यसेवा वातावरणात प्रतिबंधात्मक काळजी घेण्याच्या भूमिकेसह औषध व्यवस्थापनातील त्यांची तज्ज्ञता आवश्यक आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ सप्टेंबर

१) श्रीम. विद्या नंदकुमार कुवळेकर
रामनाथ, अलिबाग २५-९-१९६०

### सुवर्णकण



जग हे अनंत वेगवेगळ्या
वृत्तीने भरलेले आहे
त्यामधील
संघर्षामुळे आपण
कधीच सुखी होणार नाही

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# कचऱ्यामुळे स्मशानभूमीची दुरवस्था

## • कचरा डेपोच्या पर्यायी जागेचा शोध संपणार?

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

**श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन हिंदू स्मशानभूमीमधील कचऱ्याच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. नुकत्याच झालेल्या ग्रामसभेमध्ये याबाबत ग्रामस्थ आक्रमक झाले होते. ग्रामपंचायतीच्या घंटा गाडीमार्फत जमा करण्यात येणारा गावातला संपूर्ण कचरा हा वर्षानुवर्ष स्मशानभूमीमधे जमा केला जात असल्याने स्मशानभूमीची दुरावस्था झाली आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून पसरणाऱ्या दुर्गंधीमुळे स्मशानभूमीचे पावित्र्य धोक्यात आले आहे. स्मशानभूमीजवळील रस्तासुध्दा कचऱ्याने व्यापला असून अंत्यसंस्काराच्या विधींसाठी येणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.**

बोर्लीपंचतन बाजारपेठेत हॉटेल व्यवसायिक, मिठाई, किराणा व्यापाऱ्यांसह प्लास्टिक आणि थर्माकोलचे ग्लास, पत्रावळी विकणारे व्यापारी आहेत. अशा ग्लास, पत्रावळींचा घरगुती आणि सार्वजनिक कार्यक्रमातून जेवणासाठी होणारा वापर त्याचबरोबर गावातील वाढती लोकसंख्या यामुळे दिवसेंदिवस कचरा वाढत आहे. हा वाढणारा कचरा दिवसातून वीस ते पंचवीस फेऱ्यांमधून घंटागाडीद्वारे जमा केला जातो. या कचऱ्यामध्ये बहुतांश कचरा हा विघटन न होणाऱ्या प्लास्टिकचा असल्याने त्याचे ढीग जमा होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचेही नुकसान होत आहे. बोर्लीपंचतन पुलाजवळच्या प्रवेशद्वारावरसुध्दा हीच अवस्था आहे. या कचऱ्यामध्ये खाद्य पदार्थ शोधणाऱ्या मोकाट गुरांच्या पोटात हे विषारी प्लास्टिक जात असल्याने त्यांच्या जीवाला सुद्धा धोका पोहचत आहे.

कचरा डेपोसाठी गेली दोन-तीन वर्षे ग्रामपंचायत पर्यायी जागेच्या शोधात आहे. परंतु, यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने महसूल प्रशासनाकडेसुध्दा यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाकडून लेखी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाकडून पर्यायी जागा मिळाल्यास तीथेसुद्धा हीच अवस्था निर्माण झाली तर काय करणार? त्यासाठी प्रत्येक ग्रामस्थाने आपली मानसिकता बदलणे हा मोठा उपाय आहे.



### मृत्यूनंतरचा प्रवाससुद्धा वेदनादायक

**अंत्यविधी पार पाडले जातात ती जागा आपल्या संस्कृतींमध्ये अत्यंत पवित्र मानली जाते. आयुष्यभर अनंत यातना सोसणाऱ्या माणसाला मृत्यूनंतर आपल्या कुशीत सामावून घेणारी स्मशानभूमीच आजमितीला कचऱ्याच्या आणि भयानक दुर्गंधीच्या विळख्यात सापडली आहे. त्यामुळे माणसाचा मृत्यूनंतरचा प्रवाससुद्धा वेदनादायक होत आहे, एवढे मात्र नक्की.**

### मानसिकतेत बदल होण्याची गरज

**गावातील प्रत्येक कुटुंबाने 'माझा कचरा माझी जबाबदारी' समजून पर्यावरणाला घातक असणाऱ्या प्लास्टिकचा कमी वापर करून ओला कचरा, सुका कचरा याचे वर्गीकरण हे साधे उपाय घरी सुरू केले, तरी या कचरा समस्येवर बरीच मात करता येईल. मात्र त्यासाठी मानसिकतेत बदल व्हायला हवा हे महत्त्वाचे.**

## 'गुहागर-विजापूर मार्ग अडवणार'

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

गेले अनेक वर्षे गुढे फाटा-पाथर्डी मिरवणे गुढे डुगवे पातेवाडी हा रस्ता दुरुस्तीचे प्रतीक्षेत असून आत्तापर्यंत मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. शिवाय रस्त्याच्या दुतर्फा झाडी वाढली आहेत. कित्येक वेळा ग्रामपंचायतच्या माध्यमातून आणि स्थानिकांच्या माध्यमातून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी झाली. परंतु, प्रशासनाकडून याची कोणतीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे या मार्गावर एसटी आणि खासगी वाहनांचे अपघात होत आहेत. शाळेत जाणाऱ्या मुलांना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे पंचक्रोशीतील नागरिक त्रस्त आहेत. त्यामुळे या रस्त्याची तात्काळ दुरूस्ती करावी. या सर्वांचा विचार न केल्यास प्रशासनाच्या विरोधात गुहागर-विजापूर मार्गावरून आंदोलन छेडणार असल्याचे गुढे ग्रामपंचायतचे उपसरपंच अल्पेश मोरे यांनी प्रशासनास कळवले आहे.

## प्रा. डॉ. विश्वास देशमुख पुरस्कार

**| रोहा/धाटाव | प्रतिनिधी |**



रोहा तालुक्यातील कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे कोलाड येथील प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख यांना माधवबाग हॉस्पिटल खोपोली येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

खालापूर तालुक्यामधील खोपोली येथील माधवबाग हॉस्पिटल यांच्या वतीने शिक्षण, संस्कार समाजहितासाठी योगदान देणाऱ्या आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रा. डॉ. विश्वास देशमुख यांना यावर्षीचा जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. देशमुख हे गेली पंधरा वर्षापासून अर्थशास्त्र विषयात पवित्र ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. त्यांनी आजवर १४ रीसर्च पेपर (शोधनिबंध), १६ पेटंट व ४ पुस्तकांमधून लेखन केले आहे. सातत्यपूर्ण आजपर्यंत त्यांनी केलेल्या कामामुळे त्यांना याआधीही राष्ट्रपातळीवर त्याचप्रमाणे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. सध्या ते प्राचार्य पदावर कार्यरत आहेत.

## श्रीगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**श्रीगाव :** अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील मरीदेवी मंदिरात श्री मरीदेवी ग्रामस्थ मंडळ श्रीगाव यांच्याकडून दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ०२ मध्ये नवरात्रौत्सवानिमीत्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना रक्तदान करायचे असेल त्यांनी अमित बैकर ९०२८७२१४८७, सुनील कुथे ९२७२७६८४२६, सचिन सुतार ८१४९६३७९४१, शैलेश पाटील ७२६१९३५५७२ यांच्याकडे नावे नोंदवावी. तसेच मरीदेवी मंदिरात सकाळी १० वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन मरीदेवी ग्रामस्थ मंडळाकडून करण्यात आले आहे.



## उषाताई कांबळे पुरस्काराने सन्मानित

**| रसायनी | प्रतिनिधी |**

भारतीय बौध्द महासभा रायगडच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त रसायनीतील उषाताई कांबळे यांनी केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेऊन त्यांना भारतीय बौध्द महासभेच्यावतीने आई या बहुमूल्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ज्येष्ठ केंद्रीय शिक्षिका उषाताई पांडुरंग कांबळे यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात रायगड जिल्ह्यातील भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा, तालुका, शहर, विभाग अशा सर्व महिला कमिटीच्या सदस्यांना सदैव प्रेरणा देत संघटना वाढीसाठी महत्वाचे योगदान दिले. त्यांच्या कार्यांला गौरव म्हणून उषाताई कांबळे यांना आई या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना भारतीय बौध्द महासभेचा आई सन्मान मिळाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## हमरापूर येथे आरोग्य शिबीर

**| हमरापूर | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील हमरापूर येथे आरोग्य खात्यामार्फत ग्रामीण स्वास्थ शिबीर पार पडले.

स्वस्त नारी सशक्त परिवार या अभियानांतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिते आरोग्य केंद्राच्या डॉ. खुशबू चौधरी, हमरापूर उपकेंद्राच्या आरोग्य सेविका दिपिका पाटील, डॉक्टर फॉर युचे डॉ. राहुल सोनवणे, सारिका पाटील, सुविधा पाटील, प्रियंका पाटकर, आशा सेविका योजना पाटील, मीना पाटील यांच्या पथकाने गावातील महिलांची रक्तदाब, शुगर व इतर तपासण्या केल्या केल्या. गावातील अनेक महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.

## अनंत ठाकूर यांचे निधन

**रसायनी :** वासांबे मोहोपाडा जि.प.विभागातील लोधिवली येथील अनंत ठाकूर यांचे वयाच्या ५५व्या वर्षी निधन झाले. लोधिवली येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शोकाकुळ वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले राज, जय, भाऊ गणपत ठाकूर व ठाकूर परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य (तेरावे) शनिवार दि. २७ सप्टेंबर रोजी लोधिवली येथे राहत्या घरी होणार आहे. अनंत ठाकूर यांच्या अकस्मात जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते भारत कार्डचे वाटप

**| महाड | प्रतिनिधी |**



आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र सरकारने 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष' अभियानांतर्गत 'आदी कर्मयोगी' उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. महाड तालुक्यातील कोतुर्डे-निवाची वाडी आदिवासी वाडी येथे आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आदि कर्मयोगी अभियानांतर्गत आपल्यालागावाचाविकासआराखडा तयार करणे. त्या आराखड्याला २ ऑक्टोबर रोजी आपल्या ग्रामसभेत ठेवून मान्यता घेऊन ती सर्व कामे प्राधान्याने करावयाच्या सूचना दिल्या. आदिवासी बांधवांसाठी दळी जमिनीचे प्लॉट निश्चिती व वारस नोंद करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. तसेच या कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते धरती आबा योजनेंतर्गत दाखल्यांचे तसेच शिधापत्रिका व आयुष्यमान भारत कार्डचे वाटप करण्यात आले.

## बोगस काम तात्काळ थांबवा

### माजी नगरसेवक इनायत मुकादमांची मागणी

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

नगरपालिकेकडून सुरू असलेले मटण-मच्छी मार्केट इमारतीतील दुरुस्तीचे काम बोगस होत असल्याचा आरोप करत त्यावर माजी नगरसेवक इनायत मुकादम यांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. हे काम तातडीने थांबविण्यात यावे, अशी मागणी एका निवेदनाव्दारे मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्याकडे केली आहे. तसेच मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे.



नगरपालिका प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सुमारे २० वर्षे पडीक असलेली ही इमारत नव्याने दुरुस्त करून व्यावसायिक गाळ्यांची लिलाव प्रक्रिया राबविण्याचे प्रयत्न नगरपालिकेने सुरू केले आहे. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे आणि नियमबाह्य पद्धतीने सुरू करण्यात आले आहे. स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टमध्ये दिलेल्या सूचना व उपाययोजना न पाळता रोजंदारीवरील अकुशल मजुरांकडून रंगरंगोटी व दुरुस्ती सुरू आहे. कोणतेही अंदाजपत्रक वा निविदा प्रक्रिया न करता वार्षिक ठेक्याच्या दरपत्रकानुसार बेकायदेशीर कामे सुरू आहे. त्यामुळे जनतेची दिशाभूल होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार सादर करण्यात आली असून सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन, रत्नागिरी) यांनी चिपळूण नगरकडून नियमोचित कार्यवाही करून अहवाल मागवला होता. तरीसुद्धा त्याकडे दुर्लक्ष करून कामे अधिक वेगाने पूर्ण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे पत्रात नमूद केले आहे. हे काम स्ट्रक्चरल ऑडिट अहवालानुसार दर्जेदार साहित्य वापरून करण्याची मागणीही मुकादम यांनी केली आहे. अन्यथा कायदेशीर कारवाईचा इशारा देत झालेल्या आर्थिक नुकसानीस नगर पालिका जबाबदार राहील, असा इशारा त्यांनी पत्राद्वारे दिला आहे.

## गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून दुर्गम भागातील शाळेला भेट

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील स्टेशन ठाकूरवाडी ही दुर्गम भागातील आदिवासीवाडी आहे. या वाडीमधील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी तालुक्याचे शिक्षण अधिकारी अनंत खैरे यांनी शाळेला भेट दिली. यावेळी गटशिक्षण अधिकारी खैरे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे कौतुक केले.

यावेळी शाळेच्या आणि ग्रामस्थांच्या वतीने शिक्षण अधिकारी अनंत खैरे यांचे हस्ते बदली झालेले शिक्षक अभिजीत वाणी यांचा सत्कार करण्यात आला. या शिक्षण परिषदेत खांडपे केंद्रातील ३५ शिक्षक सहभागी झाले होते. अतिदुर्गम भागातील शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्टेशन ठाकूरवाडी शाळेचे मुख्याध्यापक वेच्या गावित तसेच संजय राठोड, ज्ञानेश्वर येळदरे यांचे गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे यांनी कौतुक केले.

### २३ नोव्हेंबरला होणार परीक्षा | शिक्षणक्षेत्रात गोंधळाचे वातावरण

# शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी टीईटी बंधनकारक

**| सिंधुदुर्ग | प्रतिनिधी |**

शिक्षक नियुक्तीसह सेवेत कायम राहण्यासाठी व पदोन्नतीचे लाभ मिळवण्यासाठी शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण होणे बंधनकारक असल्याच्या राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिह्यातील सुमारे २ हजार शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक झाले आहे. महाटीईटी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले असून २३ नोव्हेंबरला ही परीक्षा होणार आहे. दरम्यान, शिक्षक म्हणून सेवेत असलेल्या आणि शेवटची पाच वर्षे शिल्लक असलेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेतून न्यायालयाने सूट दिली आहे. मात्र नव्या शिक्षकांसह ५३ वर्षांपर्यंतच्या शिक्षकांना ही परीक्षा बंधनकारक करण्यात आल्यामुळे शिक्षण क्षेत्रात गोंधळ निर्माण झाला आहे.



शिक्षण हक्क कायद्याच्या २०१० च्या तरतुदीनुसार शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा देणे आवश्यक असल्याची तरतूद आहे. याच अनुषंगाने नव्याने शिक्षक म्हणून नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना २०१२ पासून टीईटी परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. तर सेवेत असलेल्या शिक्षकांनीही टीईटी देण्याचा मुद्दा पुढे आला होता. त्यामुळे टीईटी परीक्षा देण्याचा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी जे उमेदवार शिक्षक पदावर नियुक्त झाले, त्यांना ही परीक्षा देणे आवश्यक आहे का, या मुद्यावर निर्णय होण्यासाठी महाराष्ट्र व तामिळनाडूसह अन्य काही राज्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

अल्पसंख्याक समुदायाच्या शिक्षण संस्थांतील शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा बंधनकारक करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे का? त्यामुळे या शिक्षणसंस्थांच्या हक्कांवर काही परिणाम होणार आहे का? याची तपासणी करण्यासाठी हा मुद्दा विस्तारीत खंडपीठाकडे सुपुर्द करण्यात आला आहे, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

### परीक्षेच्या निकालावर नोकरीचे भवितव्य

सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या सुमारे १ हजार ३४७ शाळा असून यामधून पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. यासाठी सुमारे ३ हजार ५०० शिक्षक कार्यरत आहेत. यातील २०१९ मध्ये भरती झालेले विज्ञान विषयासाठीचे ९२ शिक्षक आणि २०२३-२४ च्या भरती प्रक्रियेतील सुमारे ७०० शिक्षक असे सुमारे ८०० शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. तर उर्वरित २७०० पैकी काही शिक्षक पुढील पाच वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत. तरीही सुमारे दोन हजारच्या आसपास शिक्षकांना टीईटी परीक्षा द्यावी लागणार आहे. या परीक्षेच्या निकालावर त्यांच्या नोकरीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## निवडक



### शासकीय कार्यालय परिसराची स्वच्छता

**कोर्लई :** गेल्या दोन तीन महिन्यांपासून मुरुडच्या तहसीलदार व रजिस्टर कार्यालय परीसरात वाढलेले गवत, कचरा व घाणीचे साम्राज्य पसरले होते. त्यामुळे विविध कामानिमित्त या ठिकाणी येणारे नागरिक व संबंधित अधिकारी वर्गाच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता. हे वृत्त दैनिक वृत्तपत्रातून प्रसिद्ध करण्यात आले होते. तर सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी या परिसरातील अस्वच्छतेबाबत आवाज उठविला होता. कार्यालयाच्या जवळपास शौचालय व प्रसाधनगृह आहे. पावसाळा सुरु होऊन दोन महिने होताच या परीसरात गवत आणि घाणीचे साम्राज्य पसरले होते. कार्यालयांच्या मागील बाजूस झाडी-झुडपे वाढली असल्याने सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांपासून धोकादेखील उद्भवण्याची भिती होती. मात्र प्रशासनाने याची दखल घेऊन याठिकाणी स्वच्छता केल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.



### ब्युटीपार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील रोहिदास वाडी, गोरेगाव येथे दिनांक सोमवारी (दि.२२) सामाजिक, शैक्षणिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या चारिझेन फाऊंडेशनच्यावतीने शिलाई मशीन व ब्युटीपार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास चारिझेन फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, संस्थेचे कोऑर्डिनेटर सचिन वाघ व किशोर झेमसे यांच्यासह रोहिदासवाडी अंगणवाडी सेविका अर्चना गोरेगावकर व अंगणवाडी मदतनीस कोमल गोरेगावकर उपस्थित होते. या कार्यक्रमप्रसंगी चारिझेन फाउंडेशनचे सचिन वाघ यांनी महिलांना व्यवसायिक प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच या कौशल्यांच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधता येते, याबाबत मार्गदर्शन केले. महिलांना शिलाईचे प्रशिक्षण सुजाता इंगळे तर ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण अनिता चौधरी यांनी दिले. यावेळी शिलाई वर्गातील १३ महिलांना आणि ब्युटीपार्लर वर्गातील ७ महिलांना बेसिक व अँडव्हान्स प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे देण्यात आली.





### गडसंवर्धन मोहिमेतून गडाची स्वच्छता

**कोलाड :** नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून रविवारी (दि.२१) स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेची दुर्ग सुरगड ३८वी मोहीम मोठ्या उत्साहात पार पडली. या मोहिमेतून गडाची गडदेवता अन्साई माता मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अजय भोसले आणि सल्लागार विश्वासजी सानप यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम मोठ्या उत्साहात उपस्थित शिलेदारांनी पार पाडली. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड जिल्ह्यातील तसेच रोहा तालुक्यातील सुरगडावर ही मोहीम सर्वत्र सुरू आहे. नवरात्री उत्सवाचे औचित्य साधून स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेच्या शिलेदारांनी अन्साई माता मंदिर परिसरात वाढलेली काटेरी झूडपे, तर गडमार्गावर अतिवृष्टीमुळे पडलेली झाडे बाजूला करत यांची सफाई केली. दसऱ्याच्या निमित्ताने अन्साई माता मंदिरात शस्त्रपूजन केले जाते आणि गडाचे पूजनदेखील केले जाते. या कार्यक्रमांसाठी स्थानिक सुरगड संवर्धन संस्थेचे शिलेदार पुन्हा नव्या उमेदीने आणि नव्या जोशाने गडसंवर्धनासाठी एकत्र आले.



### राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. व्हि.एस. इंदुलकर हे होते. त्यांनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश विशद करताना विद्यार्थ्यांची भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एच.के. जगताप उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परिपूर्ण व सक्षम बनले पाहिजे तसेच विविध स्किल शिकून स्वयंपूर्ण बनले पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश व विद्यार्थ्यांची भूमिका यावेळी समजून घेतली.

### आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**उरण :** यु.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी येथे दि. १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान आयोजित केलेल्या पाच दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप समारंभपूर्वक झाला. हा कार्यक्रम महाराष्ट्र शासन गृहनिर्माण विभाग तसेच सिव्हिल डिफेन्स फोर्स, उरण यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. यावेळी राहुल कटवाणी, डॉ. सत्या ठाकरे, मनोहर म्हात्रे, नोडल अधिकारी, सिव्हिल डिफेन्स फोर्स, ज्योती म्हात्रे व हरेश्वर ठाकूर, सिव्हिल डिफेन्स फोर्सचे प्रशिक्षक तसेचसिव्हिल डिफेन्सची टीम उपस्थित होती. यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, ॲड. अपूर्वा ठाकूर, डॉ. मीनाक्षी गुप्ता, प्राध्यापकवर्ग तसेच एन.एस.एस.चे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

**महेश पवार** — **चौथी माळ**

## पळस येथील पळसाई माता

चारशेहून अधिक वर्षाचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या रोहा तालुक्यातील नागोठण्याजवळील पळस येथील श्री पळसाई मातेच्या नवरात्र उत्सवाला सोमवारी (दि.२२) सप्टेंबरपासून प्रारंभ झाला आहे. नवरात्रोत्सवासाठी मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व विविध रंगी फुलांची सजावट करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वीच जिर्णोध्दार करण्यात आलेल्या श्री पळसाई देवीचे मंदिर आजही तितक्याच प्रकर्षाने आपल्या जुन्या आठवणींची साक्ष देत उभे आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रोहा तालुक्यातील नागोठणेपासून चार किलोमीटर अंतरावर असलेल्या पळस गावची ग्रामदेवता असलेले श्री पळसाई माता देवस्थान गावापासून काही अंतरावर पूर्वेकडील आमराईत निसर्गरम्य वातावरणात वसलेले आहे. मंदिर गावाच्या पूर्वेस पूर्वाभिमुख असून, देवीच्या नावावरून गावाचे नाव पळस पडले आहे.



जिल्ह्यातील प्रमुख देवस्थानांमध्ये गणल्या जाणाऱ्या रोहा तालुक्यातील पळसाई देवीच्या उगम स्थानापासून ते अगदी स्थापनेपर्यंतच्या अनेक कथा पळस गावातील जुने जाणते बुजुर्ग मंडळींकडून आजही सांगितल्या जातात. पळस गावात राहणारा बहुतांश समाज हा जरी मराठी वर्गात येत असला तरी या देवीच्या उगम स्थानापासून स्थापनेपर्यंत जोडलेली सर्व नाती ही मराठी समाजाबरोबरच येथे पूर्वाश्रमी पासून राहणाऱ्या आगरी समाजातील भोपी कुटुंबीयांशी अधिक दृढ असल्याचे सांगण्यात येते. आई पळसाई मातेने दिलेल्या दृष्टांताप्रमाणे गावातील ग्रामस्थ गणपत भोपी यांच्या स्वप्नात येऊन आपल्या उगम स्थानाबद्दल देवीने त्यांना सांगितले अशी आख्यायिका सांगितली जाते. यानंतर उगम स्थानापासून आणण्यात आलेली या देवीची जुनी मूर्ती मंदिरा लगत असलेल्या आंब्याच्या झाडाखाली स्थापन करण्यात आली आहे. तर सध्या मंदिरात ठेवण्यात आलेली देवीची प्रशस्त मूर्ती कोरी करून घेण्यात आली असल्याचे सांगितले जाते. मात्र शिव पूर्व काळात स्थापना करण्यात आलेल्या आई श्री पळसाई देवीचे उगमस्थान मंदिराच्या पश्चिमेस शंभर मीटरच्या अंतरावर एका पिंपळाच्या झाडाखाली असून आजही या पिंपळाच्या वृक्षाखाली मूर्तीच्या उगम स्थानाची साक्ष देणारी अवशेष दिसतात. विशेष म्हणजे नवसपूर्ती नवस फेडण्यासाठी येणारी महिला व पुरुष मंडळी ही नऊ दिवस मंदिरात राहतात. यावेळी मंदिरात राहणाऱ्या भक्तांसाठी सामूहिक भोजनही ठेवण्यात येते.नवरात्रोत्सवात नऊ दिवसांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या भरगच्च धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पाचव्या माळेचे येथे असलेले अनन्य साधारण महत्व हे या नवरात्र उत्सवातील येथील प्रमुख आकर्षण असते. या दिवशी लाखोंच्या संख्येने भक्तगण देवीच्या दर्शनासाठी मंदिरात येतात आणि त्यावेळी मंदिर परिसराला एखाद्या मोठ्या जत्रेचे स्वरूप येते.

**शशिकांत मोरे**

## धाटाववासियांचे श्रीसोनारसिद्ध महाराज

धाटाव गावच्या पूर्वेकडे भैरीदेविचे प्रख्यात मंदिर,पश्चिमेला छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळाघर येथील महादेवाचे मंदिर, दक्षिणेला हिरवळीची दुलई चादर पांघरलेला भव्य डोंगर, उत्तरेला औद्योगिक वसाहत व जगात नावलौकिक असलेली बारमाही वाहणारी कुंडलिका नदी तर सुबक सुंदर तलावाचा आधार घेत वसलेले अपारश्रद्धा व रक्षणकर्ते असलेले धाटाववासियांचे ग्रामदैवत श्री सोनारसिद्ध महाराजांचे मंदिर ग्रामस्थांना स्फूर्ति देणारे आहे. सर्वधर्म समभावाची नांदी राखून नावारुपाला आलेले हे पुरातन खेड़े म्हणजे आजवर एकात्मिकतेचे प्रतिक असल्याचे पहावयास मिळत आहे. मागील २५ ते ३० वर्षांपूर्वीच्या काळाकडे पाहिले असता चार छपरी असलेले हे कौलारु मंदिर ठुमकदार दिसे.हिरव्यागार लाभलेल्या निसर्गाचे सानिध्य व पाण्याने तुडुंब भरलेला तलाव हा काही जुन्या आठवणीना उजाला देतो. ग्रामदैवत सोनारसिद्ध महाराज म्हणजे शिवाचाच अवतार आहे असे ग्रामस्थ आजवर मानतात. काळभैरव, वेताळ, विष्णु, वीरभद्र, नंदी भृगी, स्कंद व वृषभ अशा शिवगणांपैकी असलेले हे सोनारसिद्ध देवाचे शिवगण आहे. या गाभाऱ्यातील सर्व मूर्ति पाषाणाच्या असून मूर्तिना सुंदर रंग भरल्याने मूर्तिकड़े पाहिल्यास मन प्रसन्न होते. हे ग्रामदैवत गावावर आलेले आरीष्ठ,संकट दूर करते त्यामुळे गावाचे रक्षणकर्ते असल्याने ग्रामस्थांसह परिसरातील नागरिकांची सुद्धा अपारश्रद्धा आहे.



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **पाहिजेत :** अलिबागमधील नामांकित ऑफिसकरीता पदवीधर मुलगा/मुलगी भरणे आहे. संपर्क : ९९२३७५०५४९, ९४२२३८३०९९
- **अलिबागमधील आर्किटेक्ट** ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन 3d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- **श्री सिद्धीविनायकज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण,** नोकरीधंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण, अलिबाग फोन नं. ९९६०४५६९८६
- **पाहिजेत :** पाण्याचे पंप दुरुस्त करणारे मॅकेनिक व हेल्पर पाहिजेत. भेटा : हजारे एन्टप्रायजेस ९८२२००१८५३
- **अलिबागमधील** ॲड. प्रविण ठाकूर यांच्या ऑफीसकरीता टायपिस्ट मुलगा/मुलगी भरणे आहे. संपर्क :८६९८०४८९९९/९८८१७६५५५५
- **१५०० स्क्वेअर फुट शेड भाड्याने देणे आहे.** पत्ता चोंढी-बामणसुरे, मो.९९२२१६०२७७.
- **पिंपळभाट अलिबाग येथे मेडीकल एजन्सीजमध्ये कामासाठी** मुले/मुली पाहिजेत. शैक्षणिक पात्रता, दहावी व दहावीच्या पुढे तसेच मालाच्या डिव्हीवरीसाठी ड्रायव्हर पाहिजे. Contat No. ९५०३३५५८८६, ८६९८१३४६८९
- **रिसॉर्टमध्ये कामासाठी हाऊसकिपर, वेटर, कॅप्टन आणि** ऑलराऊंडर कुक इत्यादी माणसे पाहिजेत. मो.९९२१९७८०८०

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# सततच्या पावसामुळे बळीराजा संकटात

## हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याच्या मार्गावर

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

'ईडा पिडा टळू दे, बलीचे राज्य येऊ दे' ही म्हण आता इतिहास जमा झाली आहे. एके काळी रायगडची भाताचे कोठार म्हणून इतिहासात ओळख होती. मात्र, त्याच रायगडातील बळीराजा सततच्या पावसामुळे पिकाला आलेल्या धानाची नुकसानी होत आहे. रोहा तालुक्यातील खांब देवकान्हे विभागातील शेतकतकरी सततच्या पावसामुळे हवालदिल झाले आहेत.



तालुक्यातील काही भागात मागील उन्हाळी लागवडीतील देखील येथील असंख्ये शेतकऱ्यांचे उन्हाळी हंगामातील भात पीक अवकाळी पावसामुळे पाणी साचून सडून गेले. तर काही शेतकऱ्यांनी कापणी केलेली पीके जमिनीवर लोळत वाहून त्या धानाची नासाडी झाली. काहीवेळा पूर्णपणे कुजून शेतातच राहिली त्याचे तत्काल पंचनामे देखील वरीष्ठ पातळीवरून करण्यात आले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे केल्याचा प्रशासनानी दिलासा दिला. मात्र, त्याची नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नाही. तरी देखील बळीराजा या मोठ्या संकटाला झुंझ देत पुन्हा खरिपाच्या पेरणीसाठी उसनवारी करून सज्ज होऊन खरिपाची पेरणी केली. पेरणी नंतर भरमसाठ पावसात काहींची रोप वाहून गेली.

पाऊस जरी भात पिकांना समाधानकारक पडला असला तरी आताच्या घडीला काही धान पिकला पीक देखील समाधानकारक आहे. त्याची कापणी येत्या आठ ते दहा दिवसांवर येऊन ठेपली असून मात्र वरुणराजाची विश्रांती मिळत नसल्याने तसेच तो सतत बरसत असल्याने शेतात पिकाला आलेले धान अथवा बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याच्या मार्गावर असल्याने खांब, देवकान्हे विभागासह तालुक्यातील शेतकरी चिंतेत सापडला आहे.त्यामुळे या परिस्थितीमुळे धान पिकाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते आणि बळीराजाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

परतीच्या पावसाने धुडकूस घातल्याने भातपिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी रडकुंडीस आला आहे. ९-१० दिवसांपासून संध्याकाळी किंवा रात्रीच्या वेळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस कोसळत आहे. या पावसात भाताचे तयार पिक अक्षरश: झोपले आहे. दसऱ्याच्या सुमारास कापणी केली जाते. मात्र, संध्याकाळी होत असलेल्या पावसाने भातपिकाचे नुकसान झाले. शेतात पाणी साचून राहिल्याने पिकांना कोंब फुटण्याची शक्यता आहे. शेवटच्या टप्प्यात पीक असताना पावसाने घात केल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातचे भाताचे पिक गेले आहे. अशीच परिस्थितीत भातशेतीसह तूर, वरी, नाचणीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहेत. अशातच आलेले पीक पक्षी आणि रानटी प्राणी फस्त करत असल्याने हातचे पीक गमावल्याची भावना शेतकऱ्यांची आहे. त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर नुकसानीचे पंचनामे करून भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. सततच्या पावसामुळे विविध रोग आणि किडींचा पांढऱ्या सीटोक्याचा प्रादुर्भाव वाढतो, ज्यामुळे पिकांचे आणखी मोठ्या नुकसान या तालुक्यात होते. आधुनिक तंत्र शेतात खूप ओलावा आणि पाणी साचल्याने भात कापणी यंत्रे चालू शकत नाहीत, त्यामुळे मजुरांशिवाय कापणी करणे कठीण होते. त्यात पिकांची नासाडी झाल्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसतो, कारण त्यांना उत्पादनाचा खर्चही निघत नाही. मजूर वेळेवर मिळत नाहीत त्याची देखील मजुरी वाढली आहे.

> मुसळधार पावसामुळे तयार झालेले तसेच कापणीला आलेली भातपिके जमिनीवर आडवी पडतात.तर शेतात पाणी साचून राहत असल्याने भाताला आलेले धान कुजायला लागते. त्यामुळे प्रशासनाने ओला दुष्काळ जाहीर करून पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने केली जात आहे. -डॉ मंगेश सानप
> सदस्य कुणबी समाजोन्नती संघ मुंबई तथा ग्रामीण शाखा रोहा.

## एड्स जागरूकता कार्यक्रम संपन्न

**माणगाव :** जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगावमध्ये बुधवार (दि.२४) सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात एन.एस.एस.गीताने करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.जगदीश शिगवण यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांसमोर मांडली. या कार्यक्रमास आरती राजपूत, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि ८७ विद्यार्थी उपस्थित होते.

## बनावट शिक्के बनवून देणाऱ्यांस अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलिसांनी पनवेल न्यायालयातील बनावट मायनर दाखला प्रकरणात वकिलापाठोपाठ आणखी दोघांना मुंबईतून अटक केली. या दोघांनी वकिलाला न्यायालयाचे बनावट शिक्के बनवून दिल्याचे उघडकीस आले. मोहम्मद शेख (४२, रा. भेंडी बाजार), व मोहम्मद हुसेन (३२, रा. धारावी) अशी या दोघांची नावे असून न्यायालयाने या दोघांची रवानगी पोलीस कोठडीत केली आहे. वाशीत बांधकाम व्यावसायिक लाधवजी पटेल (५७) यांना उलवे, सेक्टर-१७ मधील जमीन खरेदी व्यवहार पूर्ण करण्यासाठी न्यायालयातून मायनर दाखला घेणे आवश्यक होते. यासाठी पटेल यांनी न्यायालयात अर्ज देखील दाखल केला होता; मात्र प्रक्रिया विलंबाने सुरू असल्याने ओवळे येथे राहणाऱ्या सागर घरत याने एका वकिलामार्फत लवकरात लवकर मायनर सर्टिफिकेट तयार करून १० सप्टेंबर रोजी पटेल यांना न्यायालयीन आदेशाची प्रत दिली होती. मात्र न्यायाधीश कोठळीकर यांची सही व शिक्का असलेल्या या दाखल्याची पनवेल न्यायालयात पडताळणी केली असता, हा दाखला बोगस असल्याचे उघड झाले. त्यानंतर पटेल यांनी आपल्या वकिलामार्फत सागर घरत याला न्यायालयासमोर हजर केले असता, त्याने ही प्रत खारघर येथील ॲड. शर्मा यांनी दिल्याचे सांगितले होते. त्यानंतर न्यायालयाची फसवणूक केल्याप्रकरणी ॲड. व्ही. के. शर्मा याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात ॲड. शर्मा याने मोहम्मद शेख व मोहम्मद हुसेन या दोघांकडून न्यायालयाचे बनावट शिक्के बनवून घेतल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी या दोघांना अटक केली. त्याला देखील नोटीस बजावण्यात आल्याची माहिती सचिन पोवार यांनी दिली.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या स्मृतिदिनाची तयारी पूर्ण




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील चिरनेर गावी २५ सप्टेंबर रोजी, चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ९५ व्या. हुतात्मा स्मृतीदिन कार्यक्रमाची चिरनेर गावात जोरदार तयारी सुरू आहे. चिरनेर ग्रामपंचायत, राजिप व उरण पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी २५ सप्टेंबर रोजी चिरनेर जंगल सत्याग्रहाचा हुतात्मा स्मृतिदिन चिरनेर येथील हुतात्मा स्मृतीस्तंभा जवळ साजरा करण्यात येणार असून, मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली व खा. बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात येणार आहे.

या अभिवादन सोहळ्यासाठी माजी आ. मनोहर भोईर, माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. विवेकानंद पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, अविनाश कोळी, पी.पी. खारपाटील, जिल्हाधिकारी किसन जावळे, जेएनपीएचे चेअरमन उन्मेश वाघ, अलिबागच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, बबन पाटील, दिनेश पाटील, अतुल भगत, राजाशेठ खारपाटील, संतोष ठाकूर, विनोद म्हात्रे, धनेश गावंड, शुभांगी पाटील, दिलीप परदेशी, यशोदा परदेशी, किशोर गायके, सर्जेराव पाटील, हानिफ मुलानी, रवी घरत, डॉ. उद्धव कदम, राहुल देवांग, रवींद्र पाटील, भूषण पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती सरपंच भास्कर मोकल यांनी दिली.


● निधी निलेश घरत


● श्रद्धा यादव, माणगाव

## आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

शारदा नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून बुधवारी (दि २४) अतिदुर्गम भागातील केळाचा माल या आदिवासी वाडीवरील महिलांना अनंत नारंगीकर यांच्या कुटुंबियांच्या वतीने सामाजिक जीवनाशी बांधिलकी जपत साड्यांचे वाटप करण्यात आले.

चिरनेर केळाचा माळ या अतिदुर्गम भागातील आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून अनंत नारंगीकर, वंदना नारंगीकर यांच्या कुटुंबियांनी हाती घेतले. यावेळी केळ्याचे माळ अभिनव सेवा सहकारी संस्थचे पदाधिकारी दत्ता कातकरी, अशोक कातकरी, सुरेश कातकरी, रोहित कातकरी, श्रीकांत कातकरी, राम कातकरी यांच्या उपस्थितीत कविता अशोक कातकरी, वैशाली गुरुनाथ कातकरी, किर्ती रोहित कातकरी, बेबी रामा कातकरी, अमिषा अश्विन कातकरी, देवकी दत्ता कातकरी, लता दशरथ कातकरी, गुलाब सुरेश कातकरी, रुपाली अजय कातकरी सह इतर आदिवासी बांधव, महिलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. वंदना नारंगीकर यांच्या कुटुंबियांचे कौतुक केले आहे.

**रंगशक्ती**


● आरडीसीसी बँक, वडखळ


● धौम्य ग्रुप, चोरढे.


● जय मल्हार ग्रुप, शहाबाज


● भक्ती सागर सोसायटी,धाटाव (रोहा), येथील महिला वर्ग


● नवयुवक नवरात्रौत्सव मंडळ बेलकडे.


● हजारे नगर सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ, हजारे नगर बोपेले नेरळमधील महिला मंडळ.


● वसंत पुष्प एनेक्स हाऊसिंग सोसायटी मधील गरबा वृंद


● सुर्यदत्त ग्रुप.

**नातेवाईकांकडून नाराजी व्यक्त** — **मृत्यू पावलेल्यांच्या घरची हलाखीची परिस्थिती**

# एसटी प्रशासनाची मदत देण्यास टाळाटाळ

**। तळा । प्रतिनिधी ।**

**तारणे येथे मे महिन्यात झालेल्या एसटी अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यास एसटी प्रशासनाकडून टाळाटाळ करण्यात येत आहे. याबाबत मृतांच्या नातेवाईकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.**

तळा नगरपंचायत हद्दीतील तारणे येथील एका धोकादायक वळणावर ८ मे रोजी रहाटाड येथून तळा येथे येणारी रोहा डेपोची एसटी बस क्रमांक एम. एच. २० बी ३९१४ आणि आगरदंडा दिशेने जाणाऱ्या डंपर क्रमांक एन. एल. ०१ ए. एफ.९८४९ यांच्यात जोरदार धडक होऊन दुपारी एकच्या सुमारास भीषण अपघात झाला होता. या अपघातात तृप्ती विजय खुटीकर वय २२ वर्षे राहणार रहाटाड कोळीवाडा, लक्ष्मण ढेबे वय ३६ वर्षे राहणार धनगर वाडी, अनन्या रुपेश गवाणे वय ७ वर्षे राहणार आंबेत, विठ्ठल कजबजे वय ५५ वर्षे राहणार खांबवली या चार जणांचा जागीच मृत्यू झाला होता. तर अविनाश सुदाम वजरे राहणार पालघर या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. या घटनेला चार महिन्यांचा कालावधी लोटूनही मृतांच्या नातेवाईकांना एसटी प्रशासनाकडून आर्थिक मदत देण्यात आलेली नाही. मृतांच्या नातेवाईकांनी पी.फॉर्म भरून एसटी प्रशासनाकडे सर्व कागदपत्रांची पूर्तता केली आहे. त्यानुसार एसटीच्या अधिकाऱ्यांकडून ऑडिट देखील करण्यात आले असून आर्थिक मदती शिवाय इतर कोणतीही मागणी नाही. मृतांच्या नातेवाईकांकडून सत्यप्रत घेण्यात आले आहे. मात्र आर्थिक मदतीसाठी मृतांच्या नातेवाईकांनी पाठपुरावा केला असता सुरुवातीला गणपतीच्या ड्युट्या आहेत. ऑडिट बाकी आहे. ऑडिट करणाऱ्या मॅडमचा अपघात झाला आहे. तुमचा ऑडिट पूर्ण झाला आहे. पैसे अकाऊंटला जमा होणार आहेत. तुम्ही केस दाखल केली असल्याने आम्ही पुढे पत्रव्यवहार करून मार्गदर्शन घेणार आहोत. अशी टाळाटाळीची उत्तरे देण्यात आली. अपघातात मृत्यू पावलेल्यांच्या घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना या आर्थिक मदतीची नितांत आवश्यकता आहे. त्यामुळे ही मदत लवकरात लवकर मिळावी, अशी मागणी मृतांच्या नातेवाईकांकडून केली जात आहे.



> **तारणे येथील एसटी अपघातात माझी बहीण मृत्युमुखी पडली. त्यावेळी जाहीर केलेली मदत चार महिने उलटूनही मिळालेली नाही. एसटी प्रशासनाकडून दरवेळी टाळाटाळीची उत्तरे दिली जात आहेत.**
> **-अविनाश खुटीकर,नातेवाईक**

## पान ३ वरून

## दिवाळीनंतर वाजणार बार?

आदेश जिल्हा प्रशासनाला दिला आहे. या निवडणुकांसाठी विधानसभा मतदारसंघाची १ जुलै २०२५ ची मतदार यादी विचारात घेतली जाणार आहे.

त्यानुसार जिल्हा परिषदेच्या गटांमध्ये व पंचायत समितीच्या गणांमध्ये विधानसभा मतदार संघाची विद्यमान यादी विभाजीत केली जाणार आहे. ८ ऑक्टोबरपर्यंत प्रारुप मतदार यादी तयार करावी. ८ ते १४ ऑक्टोबर दरम्यान मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत. २७ ऑक्टोबर रोजी अंतीम मतदार यादी मतदान केंद्रनिहाय प्रसिद्ध करावी, असे आयोगाने जिल्हाधिकारी यांना मंगळवारी पाठवलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे.

भंडारा, गोंदीया, मुंबई शहर व मुंबई उपनगर हे चार जिल्हे वगळून राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्याअंतगत ३३६ पंचायत समित्या यांच्यासाठी हा मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. २७ ऑक्टोबरला मतदार यादी व मतदान केंद्रे जाहीर झाल्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची तारीख जाहीर केली जाईल. नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरच्या सुरुवातीला जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडतील, अशी दाट शक्यता आहे.

दरम्यान रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्याने सर्वच राजकीय पक्षांमधील इच्छुकांनी अध्यक्षपदासाठीची सेटिंग आणि जिल्हा परिषद सदस्य निवडून येण्यासाठी फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. या निवडणुका 'मिनी विधानसभा' निवडणुका मानल्या जातात. राज्यभरातील ग्रामीण मतदारांचा कौल या निवडणुकांमधून स्पष्ट होणार आहे. या निवडणुकीत स्थानिक पातळीवरील बाबी लक्षात घेवून आघाडीत की स्वतंत्रपणे लढवायच्या याचा निर्णय होईल, असे महायुती व महाविकास आघाडीने जाहीर केलेले आहे. त्यामुळे दिवाळीनंतर राज्याच्या ग्रामीण भागात या निवडणुकांचा मोठाच धुरळा उडणार आहे.

## शिधापत्रिका इष्टांक घटण्याचा धोका

हजार ८८५ व शहरी भागाची चार लाख ४१ हजार ०७२ अशी एकूण १७ लाख ०९ हजार ९५७ लोकसंख्या म्हणजेच जिल्ह्यातील जवळपास दोन तृतीयांश जनता राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याखाली संरक्षित आहे. सध्या सर्वच तालुकास्तरावर अजूनही शिधापत्रिका वितरण व लाभार्थी निवड प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आहेत. काही ठिकाणी इष्टांकापेक्षा अधिक लाभार्थी घेतले गेले आहेत. तर काही ठिकाणी खरी पात्र कुटुंब वंचित राहिले आहेत. वेगवेगळ्या दबावासह, तहसील स्तरावरील एजंटमार्फत अन्नधान्याचा लाभ घेण्यासाठी चुकीची नावे योजनेमध्ये समाविष्ट होणे अशा तक्रारी वारंवार येतात. परिणामी खऱ्या गरीब व गरजू कुटुंबांना अजूनही अन्नधान्याच्या हक्काचा लाभ मिळालेला नाही.यावर उपाय म्हणून संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे सुचविले आहे की, प्रत्येक गाव, ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिकेनुसार अचूक कव्हरेज नव्याने ठरविणे. मयत, विवाहित व स्थलांतरित सदस्यांची नावे तातडीने वगळणे. प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबिरे आयोजित करणे लाभार्थी निवडीच्या प्रक्रियेत पारदर्शकता व काटेकोरता ठेवणे.येत्या काळात केंद्र शासनाकडून अंत्योदय योजनेतील धान्यवाटप प्रति व्यक्ती या निकषावर (७.५ किलो प्रति महिना) लागू करण्याची तयारी आहे.

या बदलामुळे रायगड जिल्ह्याला दरमहा जवळपास ९७४ मेट्रिक टन धान्य कमी मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे अंत्योदय योजनेमध्ये शक्यतो चार ते दहा सदस्य असलेल्या शिधापत्रिकांचा समावेश करावा.मोठ्या सदस्य संख्या असलेल्या सर्व शिधापत्रिकांची तपासणी करून त्यांना स्वतंत्र विभक्त शिधापत्रिका देणे. त्यांचा ई-केवायसी तातडीने पूर्ण करणे अत्यावश्यक ठरणार आहे.

जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी ई-केवायसीचे प्रमाण कमी होईल या भीतीपोटी पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांकडून शिधापत्रिकेमध्ये नवीन नावे समाविष्ट केली जात नाहीत. हा प्रकार अत्यंत चुकीचा व गंभीर असून, मंजूर इष्टांक पूर्ण क्षमतेने वापरण्यासाठी नव्या पात्र कुटुंबांना तातडीने समाविष्ट करणे हाच योग्य मार्ग आहे. सध्या सुरू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज्य अभियान अंतर्गत सेवा पंधरवड्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने एखादे नावीन्यपूर्ण विशेष शिबीर राबवून लाभार्थी निवड प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| मंजू तन्वर | ९० | १९ | २६४.०० | २६ | ४० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

सही/-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक :- २५/०९/२०२५
मो. नं. ९३७२९६४६६५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) कृष्णा केशव जाधव, २) सरिता कृष्णा जाधव दोघेही रा. मु नागझरी पो. पोयनाड, ता. अलिबाग जि रायगड यांच्याकडून सदरची निवासी सदनिका कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून सदर निवासी सदनिका ही मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग येथील अलिबाग नगरपरिषद अलिबाग हद्दीतील तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील सिटी सर्व्हे नं.७७१, के ७७१,७७१/१ या मिळकतीवर बांधण्यात आलेली 'यमुना गृहनिर्माण सोसायटी मर्या. अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड' या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक ३०३ क्षेत्र ४२२ चौरस फूट बिल्टअप (कार्पेट ३०१चौ.फुट) (त्याचा अलिबाग नगर परिषद मालमत्ता क्र.ALB000004112 जुना नं.Z1BHA004155 सदनिका क्र. ३०३) ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २५/०९/२०२५

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता-दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड.

## बनावट नोटांच्या रॅकेटचा पर्दाफाश

नोटा आढळून आल्या. तपासाची सूत्रे वेगाने फिरवून पोलीस पथकाने खानदेशी याला मदत करणाऱ्या म्हसळा तालुक्यातील निगडी-पाबरे येथील सुनील बाळाराम मोरे याला अटक केली. झालेल्या कारवाईपासून फरार झालेला मेहबुब उलडे यास सोमवारी रात्री दिघी येथून ताब्यात घेण्यात आले. या तिघांना २५ सप्टेबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. हे तिघेही सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरोधात नवी मुंबईसह रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती उघड झाली आहे.

## लाडकी बहीण योजना वादात

खुले होत नाही.वेबसाइटवर आधार क्रमांक टाकल्यावर एरर दाखवले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामुळे पुढील प्रक्रिया थांबते. आधार क्रमांक टाकून पुढची प्रक्रिया करत त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर ओटीपी येत नसल्याची मोठी समस्या भेडसावत आहे. त्यामुळे ई-केवायसीची प्रक्रिया थांबून अर्ज अपूर्ण राहत आहेत. या तांत्रिक अडचणींमुळे अर्ज भरता येत नाही. जिल्ह्यांमध्ये महिलांना या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेच्या केवायसीचा सावळा गोंधळ सुरु झाला आहे. केवायसीची प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## रेवदंडा परिसरात कांदळवनावर डल्ला

केली आहे, असे जगदीश लांगी यांनी सांगितले.

जर ही स्थिती थांबवली नाही तर भूमाफिया चौल-रेवदंड्यातील संपूर्ण कांदळवन भुईसपाट करून शासनाची मौल्यवान जागा विकतील. कांदळवन कत्तल व भराव करून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या या भूमाफियांवर शासनाने कारवाई करावी. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक, राज्याचे मुख्य सचिव, पर्यावरण सचिव यांनी तातडीने चौकशी आदेश देऊन संबंधित भूमाफिया व त्यांना पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा रायगडमधीलच नव्हे तर संपूर्ण कोकणातील कांदळवन संपुष्टात येईल, असे जगदीश लांगी यांनी सांगितले.

## ओहोटीचा मोरा-मुंबई जलसेवेला फटका

येत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते. तर कधी कधी नवख्या सारंग-ड्रायव्हरमुळे लाँचेस गाळात रुतून बसतात.यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे प्रवासी संतप्त होतात. दोन वर्षांपूर्वी चार कोटी रुपये खर्चून मोरा बंदरातील गाळ काढण्यात आला होता. मात्र त्यानंतरही मोरा बंदर गाळाने भरायचे अद्यापही थांबलेले नाही. त्यामुळे मोरा बंदरातील साचत असलेल्या गाळाची समस्या कायम स्वरुपी दूर करण्यासाठी प्रवासी, मुंबई जलवाहतूक संस्था, लॉन्च मालकांकडून सातत्याने मागणी केली जात आहे.

मोरा ते भाऊचा धक्का मुंबई गाळात रुतलेली प्रवासी लाँचसेवा सुरळीत होणार आहे. मोरा मुंबई जलमार्गावरील प्रवासी आणि बोट मालकांच्या सातत्याने केलेल्या मागणीनंतर ३ कोटी रुपये खर्च करून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे ओहटीमुळे या मार्गावरील प्रवासी बोटी गाळात रुतल्याने प्रवाशांना पाच पाच तासांची प्रतीक्षा करावी लागत होती.

हा गाळ काढण्याचे काम सुरू झाल्याने वर्षाला या मार्गाने तीन लाखा पेक्षा अधिक प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार होता. या कामामुळे गेल्या अनेक वर्षे उरण-भाऊचा धक्का गाळात रुतलेली प्रवासी जलसेवा सुरळीत होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

मोरा बंदरात मागील अनेक वर्षांपासून गाळाची समस्या आहे.बंदरातील गाळाच्या कायमच्या समस्येमुळे समुद्राच्या ओहोटीमुळे ठराविक कालावधीसाठी प्रवासी वाहतूक सेवा बंद ठेवण्यात येते. कधीकधी चार-पाच दिवस प्रवासी वाहतूकच बंदच ठेवण्यात येत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते. तर कधी कधी नवख्या सारंग-ड्रायव्हरमुळे लाँचेस गाळात रुतून बसतात. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे प्रवासी संतप्त होतात.

दोन वर्षांपूर्वी चार कोटी रुपये खर्चून मोरा बंदरातील गाळ काढण्यात आला होता. मात्र त्यानंतरही मोरा बंदर गाळाने भरायचे अद्यापही थांबलेले नाही.त्यामुळे मोरा बंदरातील साचत असलेल्या गाळाची समस्या कायम स्वरुपी दूर करण्यासाठी प्रवासी, मुंबई जलवाहतूक संस्था, लॉन्च मालकांकडून सातत्याने मागणी केली जात होती. अखेर बंदर विभागाने संबंधितांकडून केलेल्या मागणीची दखल घेतली आहे. तीन दिवसांपासून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर विभागाचे अधिकारी नितीन कोळी यांनी दिली आहे. तर गाळाची समस्या दूर झाल्यानंतर या सागरी मार्गावरुन वर्षभर प्रवास करणाऱ्या सुमारे तीन लाख प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याच्या प्रतिक्रिया मुंबई जलवाहतूक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| शामा मोहन गुप्ता | ३४ | ३ ब | ०-२५-० | ०-६७ |
| | ३५ | २ब | ०-३५-० | ०-१४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२५/०९/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेल्या शेतकरी/कुळ जमिन मालक यांच्या मालकीची व प्रत्यक्षात त्यांच्या ताबे कब्जातील असणारी कै. लियाबाई एलायजा कोलाटकर (मयत) यांचे कायदेशीर वारस श्रीमती मर्य मोसेस सोलोमोन पत्ता-श्रीपाद अपार्टमेन्ट,रूम नं. १०६, दामले गल्ली, पेण, रायगड महाराष्ट्र ४०२१०७ यांच्या मालकीचे सर्व्हे क्र./गट क्र. ४८३, भोगवटदार वर्ग. २, लागवडी योग्य क्षेत्र २-१४-००, (या क्षेत्रासाठी संपुर्ण मालकी हक्क असणारी) ही जमिन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मालक व त्यांच्या जमिनीचे तपशीलवार वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ. नं. | शेतकऱ्याचे नाव | गावाचे नाव | सर्व्हे क्र./ गट क्र. | क्षेत्र हे.आर.प्र. |
|---|---|---|---|---|
| १. | कै.लियाबाई एलायजा कोलाटकर (मयत) यांचे कायदेशीर वारस श्रीमती.मर्य मोसेस सोलोमोन | मौज-विरझोली, ता. रोहा, जि.रायगड | ४८३ | २-१४-०० |
| | | | एकुण क्षेत्र | २-१४-०० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस, हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहीवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील सही करणार त्यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी, वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे. असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

दिनांक :- / / २०२५

सही/-
**ॲड. उदय व्ही. कबीर**
पत्ता:-१०९, मयुरेश स्केअर, सेक्टर.१५, प्लॉट क्र.१७, सीबीडी बेलापूर नवी मुंबई ४००६१४
मोबाईल क्रमांक ९००४०७१४२२

## अवैध गावठी दारु अड्डयांवर छापा

करण्याचा धंदा केला जातो. त्यानंतर ही दारु प्लास्टीकच्या ड्रममध्ये अथवा प्लास्टीकच्या फुग्यात भरून बाजारात विक्रीसाठी आणली जाते. आठवडा बाजारात दारु विकण्यावर अधिक भर दिला जातो. तसेच गावे, वाड्यांमध्ये दारु विक्रीचे धंदे चालविले जातात. अवैध गावठी दारुच्या आहारी जाण्याने आरोग्यावर परिणाम होण्याची भिती कायमच असते. अवैध गावठी दारु विक्री, वाहतूक व निर्मितीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाईचे सत्र सुरु ठेवले आहे. जिल्ह्यात वेगवेगळ्या पथकामार्फत छापे टाकण्यात आले आहेत. त्यामध्ये अलिबाग, कर्जत अशा अनेक तालुक्यात कारवाई करण्यात आली आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ठिकठिकाणी छापे टाकले आहेत. या छाप्यातून एक हजार ४६ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच दारुची वाहतूक करणारे ५५ वाहने जप्त केली असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क रायगड विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांनी दिली.

## कुंडलिकेत रसायन सोडून चालकाचे पलायन

पोलीस करीत आहेत. बुधवारी (दि.२४) दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान रोहा कोलाड रस्त्यावर अशोकनगर आणि पालेखुर्द गावच्या हद्दीत भरदिवसा एका अज्ञात टँकर चालकाने आरोग्यास घातक असलेले रसायन रस्त्यालगत टँकर उभे करून कुंडलिका नदीपात्रात सोडून कोलाड दिशेने पलायन केले. टँकर रिकामे करीत असताना चालकाकडून घाई गडबडीत हे रसायन रस्त्यालगत सुद्धा सांडले असल्याचे दिसून आले. काळ्या रंगाच्या रसायनामुळे रस्त्यावरील वाहन चालकांना, पादचारी वर्गाला डोळे चुरचिरण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागले आहे. त्यातच एका महिलेच्या अंगावरही हे रसायन पडल्याने या महिलेला रोह्यातील खाजगी दवाखान्यात उपचाराकरिता दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

रोह्यातील सह्याद्री वन्यजीव प्राणी संरक्षणार्थ संस्थेचे सदस्य प्रणय शिंदे आणि शरद दिसले यांच्या प्रथमदर्शी निदर्शनास येताच त्यांनी संबंधित टँकरचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला मात्र टँकर चालकाने तोवर पलायन केले होते. दोघांनीही या घटनेचे गांभीर्य कोलाड पोलिसांना कळविले. संबंधित घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरित कोलाड पोलिसांनी टँकर चालकाबाबत शोध मोहीम सुरू केली असून कोलाड पोलिस टँकर चालकाच्या शोधमार्गावर आहेत.

दरम्यान गुजरात, पुणे, चिपळूण येथून धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये रसायने घेऊन आलेले टँकर हे रसायने रिकामे केल्यानंतर कुंडलिका नदीपात्रात खाली करतातच कसे?असा प्रश्न या परिसरातील नागरिकांना पडला आहे. प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सुद्धा याकडे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचेही सर्वत्र बोलले जात आहे. मात्र आज घडलेल्या या घटनेकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी काय कारवाई करतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सदर घटनास्थळी पाहणी केली असता संबंधित टँकर चालकाने नदी पात्रात रसायन सोडून रसायन रस्त्यावर इतरत्र पडल्याचे पहावयास मिळाले. संबंधित टँकर कोलाड बाजूकडून येऊन कुंडलिका नदी पात्रात रिकामा करून गेल्याचा अंदाज आहे. इतर ठिकाणाहून येऊन कुंडलिका नदी पात्रात रसायने रिकाम्या करणाऱ्या टँकरचालक, मालक यांच्यावर कारवाई करावी, असे पोलीस प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वरिष्ठांना आम्ही कळविले आहे, असे रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनचे कार्यकारी व्यवस्थापक दयानंद नांदगावकर यांनी सांगितले.

### पनवेल महानगरपालिका

**जाहिर ई-निविदा सुचना सन २०२५-२०२६**

पनवेल महानगरपालिकेस सन २०२५-२६ या वित्तिय वर्षांकरिता निविदापत्रकांत नमुद केलेले पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रभाग निहाय मुलींना/महिलांना बांबूपासून विविध उत्पादने बनविण्याकरिता कौशल्य विकास कार्यक्रम राबविणेकामी व्यावसायिक प्रशिक्षण देणेबाबत पात्र व इच्छुक प्रशिक्षण संस्था/नोंदणीकृत पुरवठाधारक व प्रशिक्षित असलेल्या संस्था यांच्याकडून सदर कामी निविदा मागविण्यात येत आहेत. याकामी कोरे निविदा प्रपत्र www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र. मनपा/महिला व बालकल्याण विभाग/२०२५/१११
दि. २४/०९/२०२५

सही/-
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे वतीने, क्षेत्रीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कामांसाठी ई-खुली निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **कामाचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत माणगाव स्थानकावर प्रवासी लिफ्ट (०२ संख्या) (20 प्रवासी लिफ्ट / 1360 किलो / 1 स्पीड / 2 मजले / 2 थांबे / स्टेनलेस स्टील (1.5 मिमी) कार केबिन) चा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे आरडीएसओ मान्यता आणि तपशीलानुसार. **निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/ईएल/टी/4ए/2025, तारीख : 25.09.2025. अंदाजे किंमत**: रु. 91,52,542/- (जीएसटी वगळून). **निविदा फॉर्म किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 1,83,100/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे). **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 16.10.2025, दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी, वरिष्ठ प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधा किंवा रेल्वे वेबसाइट (**www.ireps.gov.in**) ला भेट द्या.

### कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना दिनांक: 25.09.2025**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून पुढील कामांसाठी खुली ई-निविदा मागवण्यात येत आहे.

**अनु क्रमांक 1. कामाचे नाव** - एसईएन/कणकवली विभागांतर्गत बेर्डेवाडी नॉर्थ अ‍ॅप्रोच कटिंग येथे बाजूच्या नाल्याचे सुधारणा काम व पुलाचे मजबुतीकरण करण्यासाठी ग्राऊटिंगची कामे करणे. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-47, अंदाजित खर्च:** ₹ 35,36,610/-, **ईएमडी** - ₹ 70,700/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 16/10/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**अनु क्रमांक 2. कामाचे नाव** - एसईएन/चिपळूण विभागांतर्गत डाउन मेन लाईन, माणगाव-गोरेगाव दरम्यान किमी 31/3-4, निजामपूर आरयुबी स्टील गर्डर ब्रिज येथे फूटपाथ स्लॅबची व्यवस्था करणे. **निविदा अधिसूचना क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-49, अंदाजित खर्च:** ₹ 3,19,456/-, **ईएमडी** - ₹ 6,400/-, **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ:** 16/10/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्याशी संपर्क साधा. (वेबसाईट: https://www.ireps.gov.in)

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकत त्यांच्या मालकाकडून विकसनाकरीता घेतलेली आहे.

**मौजे-आवळस, तालुका-कर्जत, जि.- रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) पियुष नंदकुमार जैन | १ | १/अ | ०-२५-०० | ०-२९ |
| २) रणजीत कुमार जैन | १ | १/अ | ०-२५-०० | ०-२९ |

तरी सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकसनाकरीता देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील जमीन मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन कुलअखत्यारपत्र ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. २५/०९/२०२५

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं.२४, मार्वल क्षिप्रा मुद्रे खुर्द ता. कर्जत जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| श्री. शंकर भाऊ बोराडे | ३१ | ३/ब | ०-३७-९० | ४ | ५० |

सदरील मिळकतीपैकी विक्री केलेले क्षेत्र हे आर. पॉ ०.१७.९० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २५/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

### OBJECTION TO PUBLIC NOTICE

To,
Adv. Sanjay D. Mhatre,
ShrutiSarang CHS, Room No.5,
A-wing, Brahman Aali, Alibag - Raigad

The public notice published by you in "Dainik Krishival" dated 18/09/2025 in respect of property bearing Gat No.233 situated at village Mhatroli, Taluka Alibag, District Raigad, has been read by my client Mr. Neil Nikhil Shah, (for himself and POA holder of other heirs of deceased Nikhil Manharlal Shah), and the said notice published by you is hereby objected to on behalf of my client as follows,

1. The property bearing Gat No.233 situated at village Mhatroli, Taluka Alibag, District Raigad is exclusively owned and possessed by my clients. My clients or their predecessor Nikhil Manharlal Shah never entered into nor consented to any sale transaction, agreement or arrangement with your client Mr. Ashish Ankush Warde.
2. It is clear that the said publication has been issued at the instance of your client Mr. Ashish Ankush Warde with malafide intention to harass my client, to create a flase cloud on his clear & marketable title. Such act amounts to misrepresentation, interference with ownership rigts and harassment.
3. My clients did not give any permission to you or your client to publish the notice in newspaper. Thus you had no authority or consent whatsoever to publish the said notice. Therefore, the publication is therefore illegal, unauthorized, and void ab initio, and has been deliberately made to cause wrongful loss and injury to my client.
4. By issuing such a false and defamatory notice, you and your client have caused severe damage to my client's reputation, mental peace and financial interest by devaluing his property. You and your client are jointly and severally liable for these wrongful acts and my client reserve his rights to initiate civil and criminal proceedings against both of you.
5. You are hereby called upon to immediately withdraw the said false and illegal public notice and issue a public apology in the same newspaper within 7 (seven) days from today. Failure to comply with the above demand, will leave my client with no option but to initiate civil and criminal proceedings against you and your client before competent court of law, entirely at your risk, cost and consequences.
6. Furthermore, the public at large is hereby warned not to enter into any sale, purchase or transfer transaction in respect of abovementioned property with your client. The public should take note that civil and criminal legal action will be taken against those involved in this matter and shall be liable for strict legal consequences.

Alibag
Date: 24/09/2025

Sd/-
**Adv. Amey Umesh Mhatre**
Boforce, Shreebag No.2
Alibag, District Raigad
Mobile: 9011399887

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## डिकी बर्ड यांचे निधन

**नवी दिल्ली :** क्रिकेट जगतातील महान पंच हेरोल्ड मडिकीफ बर्ड यांचे ९२ व्या वर्षी निधन झाले. बर्ड यांनी त्यांच्या कारकिर्दीत ६६ कसोटी आणि ६९ एकदिवसीय सामन्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिले. त्यांनी एकूण २६ वर्षांत ३८१ सामन्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिले. त्यांच्या कारकिर्दीत ते तीन विश्वचषकाच्या अंतिम सामन्यांमध्ये पंच होते. पंच बनण्यापूर्वी त्यांनी काउंटी क्रिकेटमध्ये यॉर्कशायरचे एक प्रमुख फलंदाज होते. काही काळ ते लीसेस्टरशायर संघाचाही भाग होते. त्यांच्या निधनाची बातमी यॉर्कशायर काउंटी क्लबने दिली. १९५६ मध्ये स्कॉटलंडविरुद्ध क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात एप्रिल १९३३ मध्ये बार्न्सली येथे जन्मलेल्या बर्ड यांनी १९५६ मध्ये काउंटी क्रिकेटमध्ये यॉर्कशायरकडून पदार्पण केले. पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ दिग्गज क्रिकेटपटू ज्योफ बॉयकॉट यांच्यासोबत खेळले होते. त्यांनी ३२ व्या वर्षी खेळातून निवृत्ती घेतली. त्यानंतर अनेक वर्षे त्यांनी प्रशिक्षक म्हणून काम केले आणि १९७३ मध्ये त्यांनी पंचगिरीच्या कारकिर्दीला सुरुवात केली. २६ वर्षांत ३८१ सामन्यांमध्ये बर्ड यांचा भारत आणि वेस्ट इंडिजशी खास संबंध होता.





## वेस्ट बोत्सवानाचे ऐतिहासिक सुवर्णपदक

**टोकिओ :** प्रतिकूल परिस्थितीतही बोत्सवानाने पुरुषांच्या ४*४०० मीटर रिले शर्यतीत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेतील पहिले आफ्रिकन विजेते बनून इतिहास रचला. त्यांनी अमेरिका आणि आफ्रिकेला कडव्या स्पर्धेत विजय संपादन केला. मुसळधार पाऊस सुरू असताना, अंतिम टप्प्यात आघाडीवर होता. मात्र, वैयक्तिक शर्यतीत विजेते ठरलेल्या २१ वर्षीय कोलेन केबिनटशिपीने अप्रतिम धाव घेतली आणि २ मिनिटे, ५७.७६ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक पटकावले. मागील १० पैकी ९ जागतिक विजेतेपदे जिंकणाऱ्याअमेरिकेने अंतिम सामन्यासाठी चारही खेळाडूंमध्ये बदल केला होता. त्यांनी आफ्रिकेला दोन हजारव्या सेकंदाच्या फरकाने हरवत रौप्यपदक मिळवले.

## कार्तिककडे कर्णधारपदाची धुरा

**नवी दिल्ली :** दिनेश कार्तिककडे टीम इंडियाचं नेतृत्व सोपवण्यात आलं आहे. त्यामुळे चाहत्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे. त्यामुळे दिनेश कार्तिकला पुन्हा एकदा भारतासाठी खेळताना पाहण्याची चाहत्यांची इच्छा पूर्ण होणार आहे. दिनेश कार्तिककडे हाँगकाँग सिक्सेस २०२५ स्पर्धेसाठी भारतीय संघातं नेतृत्व सोपवलं आहे. सचिन, धोनी, कुंबळेसारखे खेळाडू या स्पर्धेत खेळले आहेत. ही स्पर्धा नोव्हेंबरमध्ये सुरु होणार आहे. तसेच भारताचा पहिला सामना ९ नोव्हेंबरला होणार आहे. दिनेश कार्तिक स्वतःही ही स्पर्धा खेळला आहे आणि यावेळी त्याच्याकडे कर्णधारपद सोपवण्यात आलं आहे. या स्पर्धेत दिनेश कार्तिकसह दिग्गज फिरकीपटू आर अश्विन देखील खेळणार आहे. आर अश्विनने नुकतंच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. दिनेश कार्तिक आणि आर अश्विनसह इतर कोणत्या खेळाडूंची निवड केली आहे, हे मात्र स्पष्ट नाही. हाँगकाँग सिक्सेस ही स्पर्धा हाँगकाँगमध्ये खेळली जाते.



## मनहास 'बीसीसीआय'चे नवे अध्यक्ष

**नवी दिल्ली :** दिल्लीचे माजी कर्णधार मिथुन मनहास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे नवे अध्यक्ष असतील, हे रविवारी निश्चित झाले. रविवारी मंडळाच्या पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत संपेपर्यंत अध्यक्षपदासाठी मनहास यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. ऑगस्टमध्ये रॉजर बिन्नी यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. मनहास यांनी रविवारी दुपारी अंतिम मुदतीपूर्वी बीसीसीआयच्या मुख्यालयात अध्यक्षपदासाठीचा उमेदवारी अर्ज दाखल केला. या दरम्यान, बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी अंतरिम अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली होती. मंडळाच्या सर्वोच्च प्रशासकीय मंडळात आणखी एका माजी क्रिकेटपटूचा समावेश होण्याची शक्यता आहे. यात भारताचे माजी फिरकीपटू रघुराम भट यांची खजिनदार म्हणून नियुक्ती होण्याची शक्यता आहे. भट सध्या कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष आहेत. निवृत्तीनंतर त्यांनी आयपीएलमधील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, पंजाब किंग्ज आणि गुजरात टायटन्स या संघांसाठी प्रशिक्षकाची भूमिका बजावली असून बांगला देश यू-१९ संघाचे फलंदाजी सल्लागार म्हणूनही काम पाहिले आहे. एक यशस्वी देशांतर्गत क्रिकेटपटू म्हणून मनहास यांनी १९९७ ते २०१७ दरम्यान १५७ प्रथम श्रेणी सामने खेळले. यात त्यांनी ९७१४ धावा केल्या होत्या.



## संकुलमध्ये रंगणार बॉक्सिंगचा थरार

**रायगड :** राज्यस्तर शालेय बॉक्सिंग स्पर्धा अलिबागमध्ये होणार आहे. तालुक्यातील नेहुली येथील जिल्हा क्रिडा संकुलामध्ये बॉक्सिंगचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी (दि.२६) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास होणार आहे. शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अधिपत्याखाली क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्ह्यास बॉक्सिंग, खो-खो, हॅण्डबॉल, टेबल टेनिस, कबड्डी आणि कुस्ती या खेळांचे विविध वयोगटात्त राज्यस्तर स्पर्धा यजमानपद देण्यात आले आहे. या ६ खेळापैकी बॉक्सिंग खेळाचे १७ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या स्पर्धाचे आयोजन २५ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणार आहे. या राज्य स्पर्धेत राज्यातील आठ महसूल व एक राज्य क्रीडा प्रबोधिनीचा संघ असे विभागातील जवळपास ३०० खेळाडू, संघव्यवस्थापक व मार्गदर्शक सहभागी होणार आहेत. बॉक्सिंग स्पर्धेचा प्रचार प्रसार व्हावा. जिल्ह्यात सर्वदुर या खेळाची वातावरण निर्मिती व्हावी, या उद्देशाने तालुका संकूल समितीच्या माध्यमातून नेहूली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या हॉलमध्ये बॉक्सिंग रिंगची स्थापना करण्यात आली आहे.

# भारत-पाकिस्तान पुन्हा भिडणार?

## भारतीय संघ अव्वल स्थानी, सलग दुसरा पराभवामुळे लंकेचे आव्हान संपुष्टात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**आशिया चषक २०२५ मधील सुपर-४ फेरीच्या सामन्यात पाकिस्तानने श्रीलंकेचा ५ विकेट्सने पराभव करून अंतिम फेरीत पोहोचण्याच्या आशा जीवंत ठेवल्या आहेत. तर सुपर-४ च्या फेरीत सलग दुसरा पराभव पत्करल्याने स्पर्धेतील श्रीलंकेचे आव्हान जवळपास संपुष्टात आले आहे. दरम्यान, आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पुन्हा भारत आणि पाकिस्तान आमने-सामने येण्याची शक्यता आहे.**

### पॉईंट्स टेबलचं गणित

**भारतीय संघ एका विजयासह पहिल्या क्रमांकावर असून आपल्याकडे २ पॉईंट्स आहेत. तर भारताचे नेट रन रेट ०.६८९ आहे. पाकिस्तानचा संघ श्रीलंकेवर विजय मिळवून चौथ्यावरून दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. त्यामुळे त्यांचे २ पॉईंट्स आणि नेट रन रेट ०.२२६ आहे. दुसरीकडे बांग्लादेशने आपल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेला हरवलं होतं. त्यामुळे त्यांच्याकडेही २ गुण आहेत. परंतु नेट रन रेट ०.१२१ असल्यामुळे ते तिसऱ्या क्रमांकावर आहेत.**



या विजयासह अंतिम फेरीत पोहोचण्याच्या संधी पाकने अजून बळकट केल्या आहेत. या विजयासह पाकिस्तान पॉईंट्स टेबलमध्ये दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे, तर भारतीय संघ अव्वल स्थानी आहे. अजून कोणत्याही संघाने अधिकृतरीत्या अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केलेला नाही.

भारत आणि बांग्लादेश यांच्यात होणारा सामना खूप महत्त्वाचा ठरणार आहे. पॉईंट्स टेबलचे गणित भारताच्या एका विजयासह पहिल्या क्रमांकावर असून आपल्याकडे २ पॉईंट्स आहेत. तर भारताचे नेट रन रेट ०.६८९ आहे. पाकिस्तान संघ श्रीलंकेवर विजय मिळवून चौथ्या वरून दुसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. त्यामुळे त्यांचे २ पॉईंट्स आणि नेट रन रेट ०.२२६ आहे. दुसरीकडे बांग्लादेशने आपल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेला हरवलं होतं. त्यामुळे त्यांच्याकडेही २ गुण आहेत. परंतु नेट रन रेट ०.१२१ असल्यामुळे ते तिसऱ्या क्रमांकावर आहेत. ग्रुप स्टेजमध्ये सलग तीन विजय मिळवणारी श्रीलंका सुपर-४ मधील दोन्ही सामने गमावून जवळपास अंतिम फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडली आहे. त्यांचा नेट रन रेट -०.५९० आहे.

दुबईत भारत विरुद्ध बांग्लादेश हा सामना खेळला जाणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वाखालील भारतीय संघाने हा सामना जिंकला तर भारत थेट एशिया कप २०२५ च्या अंतिम फेरीत प्रवेश निश्चित होणार आहे. त्यानंतर श्रीलंका अधिकृतरीत्या स्पर्धेबाहेर जाईल आणि मग बांग्लादेश विरुद्ध पाकिस्तान सामन्याचा विजेता दुसरा फायनलिस्ट ठरणार आहे.

## सात्त्विक-चिरागची विजेतेपदाला हुलकावणी

**। शेन्झेन । वृत्तसंस्था ।**

भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना पुन्हा एकदा निराशाजनक निकालाला सामोरे जावे लागले. रविवारी येथे झालेल्या चायना मास्टर्स सुपर ७५० स्पर्धेच्या अंतिम फेरीत कोरियाच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या किम वोन हो आणि सेओ स्युंग जे यांच्याकडून त्यांचा सरळ गेममध्ये पराभव झाला.



आशियाई क्रीडा स्पर्धेतील या विजेत्यांना विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची आशा होती, पण पहिल्या गेममध्ये १४-७ अशी मोठी आघाडी गमावल्यानंतर त्यांना १९-२१, १५-२१ अशा फरकाने अवघ्या ४५ मिनिटांत पराभवाला सामोरे जावे लागले. सात्त्विक आणि चिराग यांनी संपूर्ण स्पर्धेत एकही गेम न गमावता उत्कृष्ट फॉर्म दाखवला होता. त्यांनी नुकताच दुसरा जागतिक अजिंक्यपद कांस्यपदक जिंकला होता. हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेतेपद मिळवले होते. पहिल्या गेममध्ये कोरियन जोडीने ३-० अशी आघाडी घेतली, पण भारतीय जोडीने जोरदार पुनरागमन करत स्मॅशच्या जोरावर ६-६ अशी बरोबरी साधली. चिरागच्या जाळीजवळच्या कुशल खेळाने त्यांना ११-७ अशी आघाडी मिळवून दिली आणि लवकरच ती १४-८ पर्यंत वाढली. मात्र, त्यांच्याकडून चुका होऊ लागल्या. एक व्हिडीओ अपील अयशस्वी झाल्याने त्यांचा लय बिघडला आणि कोरियन जोडीने पुढील नऊपैकी आठ गुण मिळवून १५-१५ अशी बरोबरी साधली. किमने एक सर्व्हिस चुकवली, पण एका फसलेल्या रिटर्नमुळे गुण १७-१७ असे बरोबरीत राहिले. चिरागच्या एका चुकीमुळे कोरियाला १९-१७ अशी आघाडी मिळाली, पण त्यानंतर सेओने चूक केल्याने भारतीय जोडीने १९-१९ अशी बरोबरी साधली होती.

## केरळमध्ये येणार अर्जेंटिनाचा संघ



**। तिरुअनंतपुरम । वृत्तसंस्था ।**

विश्वविजेता अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ या वर्षी (२०२५) भारतात येणार असून केरळमध्ये हा संघ ऑस्ट्रेलियन संघाशी लढणार आहे. केरळ राज्यातील क्रीडा विभागातील सूत्रांकडून याबाबतची माहिती मंगळवारी (दि.२३) देण्यात आली आहे.

अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ १२ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत केरळमध्ये येणार असल्याचे संकेत आहेत; मात्र, सध्या तरी निश्चित तारीख ठरवण्यात आलेली नाही. तसेच अर्जेंटिनाचा संघ ऑस्ट्रेलियाशी दोन हात करणार आहे. केरळमधील कोची येथे ही लढत होण्याची शक्यता आहे.

अर्जेंटिना संघातील सपोर्ट स्टाफमधील सदस्य बुधवारी (दि. २४) कोची येथील स्टेडियमची पाहणी करण्यात आली आहे. क्रीडामंत्र्यांकडून हिरवा कंदील अर्जेंटिनाचा फुटबॉल संघ केरळमध्ये मैत्रीपूर्ण सामना खेळण्यास जाणार नाही, अशाप्रकारचे वृत्त ऑगस्ट महिन्यात समोर आले होते; मात्र, केरळ राज्याचे क्रीडामंत्री व्ही. अब्दुरहिमान यांनी अर्जेंटिनाचा संघ केरळमध्ये येणार हे निश्चित आहे, असे स्पष्ट करीत शंकाकुशंकांना पूर्णविराम दिला. क्रीडामंत्र्यांकडून अर्जेंटिना संघाच्या भारतातील मैत्रीपूर्ण लढतीला हिरवा कंदील या वेळी दाखवण्यात आला आहे.

अर्जेंटिना संघटनेकडून जाहीरअर्जेंटिना फुटबॉल संघटनेकडूनही समाजमाध्यमावर भारत दौऱ्याबाबत माहिती देण्यात आली. त्यांच्याकडून सांगण्यात आले, की अर्जेंटिनाचा संघ २०२५मध्ये दोन मैत्रीपूर्ण सामने खेळणार आहे. ६ ते १४ ऑक्टोबरदरम्यान अमेरिकेत पहिला मैत्रीपूर्ण सामना असेल. तसेच १० ते १८ नोव्हेंबर दरम्यान लुयांडा, अँगोला व केरळ येथे दुसरा मैत्रीपूर्ण सामना असणार आहे.

### नेमळे विद्यालयाच्या मुलींची खो-खो स्पर्धेसाठी निवड

**सावंतवाडी :** नेमळे पंचक्रोशी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भगीरथ मैदानावर झालेल्या तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात नेमळे विद्यालयाच्या मुलींनी अंतिम सामन्यात कलंबिस्त हायस्कूलचा पराभव करून प्रथम क्रमांक मिळवला. या विजयी संघाची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. याच स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांचा संघ उपविजेता ठरला. सावंतवाडी तालुक्यातील नावलौकिक प्राप्त या शाळेतील खेळाडूंनी विविध खेळांत कौशल्य सिद्ध केले आहे.

## तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत पीएनपीचे यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

क्रीडा आणि युवक सेवा संचालनाय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अलिबाग व प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत पीएनपीच्या विद्यार्थिनींने नेत्रदीपक यश संपादन केले. स्पर्धेकरिता अलिबाग तालुक्यातून २१६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



स्पर्धेचे उद्घाटन अलिबाग पोलिस निरीक्षक किशोर साळे व पीएनपी होली चाईल्ड स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर, तालुका क्रीडा समन्वयक बी. आर. गुरव, पीएनपी क्रीडा प्रशिक्षक तेजस म्हात्रे, यतिराज पाटील, अक्षय डाकी, तसेच पंच म्हणून विलास म्हात्रे व इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्पर्धेचे आयोजन पीएनपी सायरस पूनावाला नागाव शाळेचे क्रीडा प्रशिक्षक राकेश म्हात्रे यांनी केले. या स्पर्धेमध्ये १९ वर्ष मुलींच्या गटामध्ये जेएसएम कॉलेजची विद्यार्थिनी अपेक्षा मार्भल प्रथम क्रमांक, पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलची विद्यार्थिनी तनिष्का गांधी द्वितीय क्रमांक, कार्तिकी पाटील डीकेटी स्कूल तृतीय, पीएनपी होली चाईल्ड स्कूल रोजमीन उमर चतुर्थ तर पीएनपी होली चाईल्ड स्कूल श्रावणी मोरे हिने पाचवा क्रमांक पटकावला या सर्वांची जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे.

## कराटे स्पर्धेत घोलम बंधू विजेते

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नुकत्याच पार पडलेल्या टोमिसाटो, जिम चिबा-केन नारीता, जपान येथे नुकत्याच पार पडलेल्या जपान ओपन आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत काव्य आणि भाग्य या घोलम बंधूंनी जोरदार कामगिरी केली. दोघांनी एका सुवर्ण पदकासह ३ रौप्य आणि २ कांस्य पदकाची कमाई केली. विलेपार्ले येथील



पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्लिश माध्यमात सातवीत शिकत असलेल्या काव्य घोलमची तसेच खार एज्युकेशन सोसायटी कॉलेजमधून भाग्य घोलमची या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विविध प्रकारच्या इव्हेंटमध्ये काव्य व भाग्य या दोघांनी जबरदस्त कामगिरी करताना १ सुवर्ण, ३ रौप्य, २ कांस्य पदक पटकावून शाळेचे, आई-वडिलांचे नाव उज्वल केले आहे. त्यांना प्रशिक्षक म्हणून अरविंद चव्हाण व विभावरी चव्हाण या दोघांचे मार्गदर्शन लाभले.

## रायफल शूटिंग स्पर्धेत अनंताला 'सुवर्णपदक'

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

सावंतवाडी एज्युकेशन सोसायटी संचलित कळसुलकर इंग्लिश स्कूल आणि आय. बी. सय्यद कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी सार्जंट अनंत चिंचकर याने राष्ट्रीय स्तरावरील रायफल शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या यशाबद्दल सावंतवाडीमध्ये त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. तसेच शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. ५८ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय कॅडेट कोरचा अनंत हा नववीचा विद्यार्थी आहे. दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत त्याने सुवर्णपदक मिळवले. गुरप्रीत सिंग यांच्या हस्ते त्याला हा बहुमान प्रदान करण्यात आला. त्याच्या या यशाचे कौतुक करण्यासाठी कळसुलकर इंग्लिश स्कूल आणि आय. बी. सय्यद कनिष्ठ महाविद्यालयाने त्याचे स्वागत केले.

**तरुणांचा प्रेरणादायी उपक्रम | जिल्हास्तरिय क्रिकेट सामने**

## शाळेच्या विकासासाठी स्पर्धेचे आयोजन

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

समाजासाठी आपलं देणं लागतं, या भावनेतून सिंधुदुर्गच्या देवगड तालुक्यातील बापर्डे जुवेश्वर गावात क्रिकेटचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या सामन्यातून मिळणारा संपूर्ण निधी गावातील शाळेच्या विकासासाठी वापरला जाणार आहे. क्रिकेटच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या आयोजकाचं आता सर्वत्र कौतुक होतं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, देवगड तालुक्यातील बापर्डे-जुवेश्वर गावात ही जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. डिसेंबर-जानेवारी महिन्यात स्पर्धेचे सामने खेळवले जाणार आहे. हे सामने डे-नाईट पद्धतीने होणार असल्याचं आयोजकांकडून सांगण्यात आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे या स्पर्धेतून मिळणारा संपूर्ण निधी हा गावातील शाळेला दिला जाणार असल्याचेही आयोजकांनी सांगितले. ही क्रिकेट स्पर्धा बापर्डे-जुवेश्वर गावातील यशवंतराव राणे माध्यमिक विद्यालयासाठी आयोजित करण्यात आली आहे. ही शाळा श्री देवी पावणादेवी कृपा शिक्षण विकास मंडळ संचलित केली जाते. खरं तर या शाळेला कोणताही सरकारी अनुदान नाही. मात्र, गावकऱ्यांच्या आणि समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने ही शाळा चालवली जाते आहे. याच शाळेच्या विकासासाठी क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे काही महिन्यांपूर्वी डॉ. सुधा मूर्ती यांनी स्वतः या शाळेला भेट दिली. इतकच नाही, त्यांनी 'कोण होणार करोडपती' या मराठी कार्यक्रमात जिंकलेली २५ लाख रुपयांची संपूर्ण रक्कमही त्यांनी याच शाळेला दान केली. आता या शाळेच्या विकासासाठी गावकऱ्यांपासून शहरातील तरुणांनी नवा उपक्रम हाती घेतला आहे. यासंदर्भात बोलताना आयोजकांनी स्पष्ट केलं आहे की या स्पर्धेतून मिळणाऱ्या कोणत्याही स्वरूपाच्या उत्पन्नाचा एकही पैसा वैयक्तिक फायद्यासाठी वापरला जाणार नाही. बक्षीस रक्कम वगळता उरलेला संपूर्ण निधी शाळेच्या पायाभूत सुविधांसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी व विकासासाठी वापरला जाणार आहे. ही स्पर्धा केवळ क्रिकेटप्रेमींसाठीच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक प्रेरणादायी उपक्रम आहे.





दिनांक : २९-०८-२०२५
प्रथम क्रमांक - अनिकेत पाटील-म्हात्रोळी,सारळ
द्वितीय क्रमांक - त्रिंबक वि. कुंटे-कुंठ्याचीगोठी
तृतीय क्रमांक - महादेव रामचंद्र दसवते-माणगांव

दिनांक : ३०-०८-२०२५
प्रथम क्रमांक - पांडुरंग घरत - लोणेरे-थळ
द्वितीय क्रमांक -संतोष र. खडतर - माणगांव
तृतीय क्रमांक - नागवेकर परिवार-अलिबाग

दिनांक : ३१-०८-२०२५
प्रथम क्रमांक - संतोष तुरे- मेढेखार अलिबाग
द्वितीय क्रमांक - रोशन शिवराम म्हसकर- पनवेल
तृतीय क्रमांक - सचिन अरुण माळी- तुडाल

दिनांक : १-०९-२०२५
प्रथम क्रमांक - ईश्वरी योगेश वावेकर- मेढेखार
द्वितीय क्रमांक -परेश प्रमोद घरत - कुरुळ
तृतीय क्रमांक - कल्पेश माळी- मुरुड

दिनांक : २-०९-२०२५
प्रथम क्रमांक - योगेश प्रकाश वार्डे- रांजणपाडा
द्वितीय क्रमांक - मोहन पाटील- सागाव अलिबाग
तृतीय क्रमांक - ह.बा. ठाकूर- चिरनेर, उरण

दिनांक : ३-०९-२०२५
प्रथम क्रमांक - रमेश बा. धुमाळ, नांगरवाडी
द्वितीय क्रमांक - तुषार गजानन कवळे - आवास
तृतीय क्रमांक - अनिल वर्तक- वरसोली

दिनांक- ४-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गणेश तांदळेकर- माणगांव
द्वितीय क्रमांक - काशिनाथ पाटील - नागाव
तृतीय क्रमांक - किशोर नाईक -बोरगाव पेण

दिनांक - ५-०९-२०२५
प्रथम क्रमांक - संकेत साईनाथ घरत - थळपालथी
द्वितीय क्रमांक - निखिल नायसाठे- मुरुड
तृतीय क्रमांक - राजेंद्र पाटील - दिवीपारंगी

दिनांक - ६-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गजानन पुळेकर- मुरुड
द्वितीय क्रमांक - वसंत धर्मा घरत- वरसोली
तृतीय क्रमांक - शिवाज्ञा शिवलकर- अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)